रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८८ । अंक १६४ । पृष्ठे ८ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

कृषीवल
रायगड, मंगळवार, दि. १२ नोव्हेंबर २०२४
किंमत ४ ₹

## राहुल गांधी आज महाराष्ट्र दौऱ्यावर

**मुंबई :** काँग्रेस नेते खा. राहुल गांधी उद्या मंगळवार दिनांक १२ नोव्हेंबर रोजी महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येत असून या दौऱ्यात ते दोन प्रचारसभा घेणार आहेत. बुलढाणा जिल्ह्यातील चिखली येथे काँग्रेस उमेदवार राहुल बोंद्रे आणि खामगावचे उमेदवार राणा दिलीप सानंदा यांच्यासाठी आणि गोंदिया येथे काँग्रेसचे उमेदवार गोपालदास अग्रवाल यांच्या प्रचारार्थ जाहीर सभा होणार आहेत. मंगळवारी सकाळी ९.३० वाजता राहुल गांधी यांचे विशेष विमानाने छत्रपती संभाजी नगरमध्ये आगमन होईल तिथून ते हेलिकॉप्टरने चिखली येथे पोहोचतील. दुपारी १२ वाजता ते सभेला संबोधित करतील. त्यानंतर दुपारी ३ वाजून ३० मिनिटांनी ते गोंदिया येथे प्रचारसभेला संबोधित करतील.

# धरण कागदावर, निधी खात्यावर

## सांबरकुंड धरणाचा निधी कुठेय? आ. दळवींना सवाल



**। रायगड । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यासह मुरुड, रोहा आणि पेण तालुक्यांतील काही गावांना संजीवनी ठरणारे सांबरकुंड धरण गेल्या चाळीस वर्षांपासून केवळ कागदावर आहे. अंतिम निवड होऊनही धरणग्रस्तांना योग्य मोबदला दिला जात नसल्याने या धरणाची उभारणी लांबणीवर गेली आहे. अशातच सांबरकुंड धरणाच्या डागडुजीसाठी ८५ कोटी आणि दुरुस्तीसाठी १४ कोटी असा एकूण ९९ कोटींचा निधी आणल्याचे स्थानिक आमदारांनी माध्यमांसमोर कबूल केले. परंतु, प्रत्यक्षात सांबरकुंड धरणासाठी अपेक्षित असणारे भूसंपादन आणि धरणग्रस्तांचे पुनर्वसन हे महत्त्वाचे प्रश्न प्रलंबित आहेत. असे असताना, स्थानिक आमदारांनी आणलेला कोट्यवधी रुपयांचा निधी नेमका कुणाच्या खात्यावर गेला, असा सवाल सांबरकुंड धरणग्रस्तांमधून विचारला जात आहे.

सांबरकुंड मध्यम प्रकल्पासाठी जांभुळवाडी, खैरवाडी, सांबरडोह वाडी, महानवाडी आणि महान गावातील शेतकऱ्यांच्या १०३.८१ हेक्टर जागेचे भूसंपादन करण्यात येणार आहे.

•➤ पान ५ वर

> सांबरकुंड धरण अद्याप उभे राहिलेले नाही. धरण उभारणीसाठी अपेक्षित असणारी जमीन शासनाने कागदावर खरेदी करण्यासाठीचा अंतिम निवाडा केला आहे. असे असलेतरी अद्याप शेतकऱ्यांना भूसंपादनाचा मोबदला दिला गेला नाही. शेतकऱ्यांना नवीन भूसंपादन कायद्यानुसार मोबदला पाहिजे आहे. त्यासाठीचा प्रस्ताव शासनाच्या दरबारात पडून आहे. शेतकऱ्यांना विचारात न घेता भूसंपादनाची प्रक्रिया करण्यात आली आहे. महान आणि महानवाडी या दोन गावांच्या पुनर्वसनचा प्रश्न शासन दरबारी प्रलंबित आहे. यामुळे सांबरकुंड धरण अजूनही कागदावरच आहे. धरण बांधलेले नसतानाही डागडुजी आणि दुरुस्तीसाठी शासनाने निधी देऊ केला हे संशयास्पद आहे. सांबरकुंड धरणाच्या डागडुजी आणि दुरुस्तीसाठी शासनाने निधी दिला असेल, तर आणलेला निधी कोठे खर्च केला याचा ताळेबंद धरणग्रस्तांसह जनतेसमोर सादर करावा.
>
> – ॲड. राकेश पाटील, सामाजिक कार्यकर्ते

# जमिनीचे पैसे नको, प्रकल्पात भागिदारी द्या

## भाई जयंत पाटील यांची मागणी



**। रायगड । प्रतिनिधी ।**

अलिबागची आपली आमदारकी गेली आणि पाच हजार कोटींचे नुकसान झाले आहे. उद्याची मुंबई अलिबागच्या दारात येऊन ठेपली आहे. जमिनीचे पैसे नको, प्रकल्पामध्ये भागीदारी द्यावी, अशी मागणी शेतकरी कामगार पक्ष करणार आहे. जमिनीचे मालक म्हणून शेतकरी जगला पाहिजे. भविष्यात रत्नागिरीपर्यंत मुंबई पोहोचणार आहे. त्याचा आराखडा तयार झाला आहे. या विकासाचा वेध घेऊन जनतेचे प्रश्न शासन दरबारी मांडणाऱ्या सुशिक्षित उमेदवाराला निवडून द्यावे, असे आवाहन शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील यांनी केले.

अलिबाग तालुक्यातील कुरुळ येथील राही गार्डनमध्ये आढावा रविवारी (दि. १०) बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. यावेळी संजय पाटील, ॲड. मानसी म्हात्रे, उबाठा गटाचे अमीर ठाकूर, प्रफुल्ल पाटील, प्रकाश पाटील, नंदकुमार पाटील, श्रीकांत पाटील, सुरेश पाटील, अशोक घाडगे,

•➤ पान ५ वर

### 'विकासाच्या नावावर पोकळ गप्पा'

शेतकरी कामगार पक्षाची विजयाच्या दिशेने वाटचाल सुरू केली आहे. मतदारसंघात महाविकास आघाडीच्या विजयाचे वारे वाहात आहेत. विरोधकांची वेडंवाकडं बोलण्याची हिंमत नाही. कुरुळ ग्रामपंचायत आणि परिसरात विकासाच्या नावाने महायुतीच्या उमेदवाराने केवळ आश्वासने दिली आहेत. विकासाच्या नावावर पोकळ गप्पा मारल्या जात आहेत, विकास केवळ कागदावर झाला आहे, अलिबागची शान घालवण्याचे काम विरोधकांनी केले आहे. ही लढाई विचारांची आणि संस्काराची लढाई आहे, यामुळे महाविकास आघाडी आता पेटून उठली आहे, असे ॲड. मानसी म्हात्रे म्हणाल्या.

**आजचा अग्रलेख**

**नॅरेटिव्ह म्हणजे काय?**

## वे|ध|क

### संजीव खन्ना नवे सरन्यायाधीश



**नवी दिल्ली :** न्यायमूर्ती संजीव खन्ना यांनी सोमवारी (दि. ११) देशाचे ५१ वे सरन्यायाधीश म्हणून शपथ घेतली. न्या. खन्ना यांना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी शपथ दिली. राष्ट्रपती भवन येथे झालेल्या या शपथविधी समारंभावेळी देशाचे मावळते सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड उपस्थित आहेत. न्यायमूर्ती संजीव खन्ना यांना वकिलीचा वारसा वडील देवराज खन्ना यांच्याकडून मिळाला. देवराज खन्ना दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायाधीश होते, तर काका हंसराज खन्ना हे सर्वोच्च न्यायालयात न्यायमूर्ती होते.

### तक्रारीसाठी टोल फ्री क्रमांक

**रायगड :** विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आचारसंहिता भंगाच्या तक्रारीसाठी जिल्हा निवडणूक प्रशासनातर्फे टोल फ्री संपर्क क्रमांक उपलब्ध करुन देण्यात आल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी किशन जावळे यांनी दिली. नागरिकांना आचारसंहिता भंगाच्या तक्रारी करावयाच्या असल्यास त्यांनी ०२१४१-२२२११८ आणि १९५० टोल फ्री क्रमांकावर नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा. या कक्षाद्वारे तातडीने तक्रारीची दखल घेण्यात येईल. हा कक्ष २४ तास सुरू राहणार असून, कर्मचाऱ्यांची नियुक्त करण्यात आले आहेत.

### ११ दहशतवादी ठार

**नवी दिल्ली :** मणिपूरमध्ये सीआरपीएफच्या जवानांनी दहशतवाद्यांच्या विरोधात मोठी कारवाई केल्याची माहिती समोर आली आहे. जिरीबाम भागात सीआरपीएफच्या चकमकीत ११ संशयित दहशतवादी ठार झाल्याचे वृत्त समोर आले आहे. सीआरपीएफच्या जवानांनी केलेल्या कारवाई दरम्यान दोन जवानही गंभीर जखमी झाले आहेत. दरम्यान, रविवारी दहशतवाद्यांनी काही दुकानांना आग लावली होती. तसेच त्यांनी काही घरांवर आणि सीआरपीएफ कॅम्पवरही हल्ले केले होते. यानंतर जवानांकडून दहशतवाद्यांविरोधात कारवाईची मोहीम राबवण्यात आली. यावेळी जवानांनी केलेल्या चकमकीत ११ संशयित दहशतवादी ठार झाले आहेत.

# निवारा शेडचे काम कागदावरच

- दळवींच्या समर्थकांकडून कामास टाळाटाळ
- स्थानिक ग्रामस्थांचा आरोप



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील नवेदर बेली येथील स्मशानभूमी निवारा शेडचे काम दोन वर्षांपूर्वी जिल्हा नियोजनमधून मंजूर झाले होते. आमदार महेंद्र दळवी यांच्या ठेकेदाराने या कामाला साधा दगडही लावला नाही. त्यामुळे हे काम अजूनही कागदावरच असून, ठेकेदाराकडून ते करण्यास टाळाटाळ होत असल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे.

अलिबागपासून काही अंतरावर नवेदर बेली गाव आहे. खाडी किनारी असलेल्या या गावालगत स्मशानभूमी आहे. या स्मशानभूमीसमोर निवारा शेड बांधण्याचे काम जिल्हा नियोजन समितीमार्फत २०२२-२३ मध्ये मंजूर झाले. मार्च २०२४ पर्यंत त्याचे काम पूर्ण होणे अपेक्षित होते. परंतु, या दोन वर्षांत साधा दगडही या जागेत बसविण्यात आला नाही. निवारा शेडचे काम न झाल्याने त्याचा

•➤ पान ५ वर

### ऐन निवडणुकीत कामाचा दिखावा

**दोन वर्षांत निवारा शेड करण्यास जमले नाही, ते आता निवडणूक जाहीर झाल्यावर दळवी समर्थकांच्या दुर्लक्षपणामुळे रखडलेले काम सुरु करण्याचा दिखावा करण्यात आला आहे. मात्र, येथील मतदार सुज्ञ असून, दिखावा करणाऱ्यांना मतदार जागा दाखविणार, अशी संतापजनक प्रतिक्रिया स्थानिक ग्रामस्थांमधून उमटत आहे.**

# पक्षाचे काम करण्यावरून जीवघेणा हल्ला

## भाजप आणि महेंद्र दळवी समर्थकांमध्ये राडा

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

शिंदे गट आणि भाजपाचे अंतर्गत कलह जगजाहीर असतानाच रविवारी रात्री शिंदे गटातील महेंद्र दळवी समर्थकांवर निवडणुकीत पक्षाचे काम करण्यावरून भाजपच्या कार्यकर्त्याने जीवघेणा हल्ला केला. त्यामध्ये तो गंभीर जखमी झाला असून, त्याला अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

शैलेश नाईक असे या आरोपीचे नाव आहे. तो भाजपचा कार्यकर्ता असून, अपक्ष उमेदवार दिलीप भोईर यांचा समर्थक आहे. तसेच जखमी अभय घरत हा इसम आमदार दळवी यांचा समर्थक असल्याची माहिती समोर येत आहे. आरोपी शैलेश नाईक त्यांच्या घरात रात्री बसला होता. त्यावेळी अभय घरत त्यांच्या घरी गेले. ''तू छोटमचे काम करतो की अन्य कोणाचे'' असा सवाल घरत यांनी उपस्थित केला. त्यावेळी दोघांमध्ये शाब्दिक वाद झाला. हा वाद विकोपाला गेला. शैलेश नाईक याने रागाच्या भरात हातात असलेल्या चमच काट्याने अभय घरत यांच्यावर वार केले. त्यामध्ये ते गंभीर जखमी झाले.

महायुतीमधील भाजप आणि शिंदे गट सुखी समाधानाने आहेत, असा दिखावा कायमच करीत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. परंतु, या घटनेनंतर या दोन्ही पक्षातील अंतर्गत कलह पुन्हा चव्हाट्यावर आला आहे. प्रचाराचे काम करण्यावरून दोन कार्यकर्त्यांमध्ये झालेल्या जीवघेणा हल्ल्याबाबत वेगवेगळ्या चर्चेला ऊत आला आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी कायदा व

•➤ पान ५ वर

> रायगड पोलिसांकडून ऑल आऊट मिशनपासून रुट मार्चसारखे उपक्रम राबविले. परंतु, अलिबागसह अनेक भागात निवडणुकीच्या निमित्ताने होणाऱ्या हाणामारी व जीवघेणा हल्ला करणाऱ्यांवर अंकुश ठेवण्यास पोलीस अपयशी ठरल्याची चर्चा आहे. त्यामुळे जिल्ह्यातील मतदान व मतमोजणी प्रक्रिया सुरळीत व शांततेत पार पाडण्यासाठी पोलीस प्रयत्न करतील का, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

# आक्षीच्या साई मंदिरात चोरी

- घंटा, समई लंपास; पोलिसात तक्रार दाखल

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील आक्षी येथील साई मंदिरातून भरदिवसा चोरट्यांनी चोरी केल्याची घटना घडली. मंदिरातील घंटा आणि समई चोरीला गेल्याची माहिती पोलिसांनी दिली. याप्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आक्षी येथील साई मंदिर एक जागृत देवस्थान म्हणून ओळखले जाते. या मंदिरात दर्शनासाठी भाविक येत असतात. मंदिरातील समई आणि घंटा चोरीला गेल्याचे स्थानिकांच्या निदर्शनास आले. याप्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात अज्ञाताविरोधात तक्रार दाखल केली आहे.

सध्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नाक्या-नाक्यावर स्थिर सर्वेक्षण पथकासह भरारी पथक तैनात करण्यात आले आहेत. महसूल, सार्वजनिक बांधकाम व इतर विभागातील कर्मचाऱ्यांसह पोलीसही त्यांच्यासोबत असतात. निवडणुकीच्या निमित्ताने काही गैरप्रकार होऊ नये यासाठी पथक तैनात करण्यात आले आहेत. जिल्ह्यात इतका कडेकोट पहारा असतानाही आक्षीतील मंदिरातून ऐवज लंपास करून चोर पसारही झाले. त्यामुळे मालमत्ता सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. याकडे अलिबाग पोलीस लक्ष देतील का, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

# मुजोर आमदाराची मस्ती उतरविणार

## आगरी, कोळी, कराडी समाजाचा निर्धार



**। पनवेल । प्रतिनिधी ।**

आगरी, कोळी, कराडी, आदिवासी समाजबद्दल अवमानजनक भाषा वापरणाऱ्या आ. महेश बालदी यांना सत्तेची मस्ती चढली असून, या निवडणुकीत हा स्थानिक समाज या उद्दाम आमदाराची घमेंड उतरवून मस्ती जिरवल्याशिवाय राहणार नाही, असा स्पष्ट इशारा शिवकरचे माजी सरपंच अनिल ढवळे यांनी दिला.

उरण विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या निमित्ताने शेकाप नेते प्रीतम म्हात्रे यांची पलस्पे रॅली आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी पळस्पे ग्रामस्थासमोर ते बोलत होते. सभेसाठी सचिन ताडफळे, महेश साळुंखे, शिवाजी काळे, मोहन गवंडी, विलास गवंडी आदी उपस्थित होते. यावेळी बोलताना अनिल ढवळे म्हणाले की, उरण तालुका ही लढवय्याची भूमी आहे. शेतकऱ्यांनी येथे आपले रक्त सांडून आंदोलने यशस्वी केली आहे. त्याच्या बलिदानाचा आम्हाला सार्थ अभिमान आहे, त्या हुतात्म्यांच्या भूमीतून हा मस्तवाल आमदार आगरी कोळी, आदिवासी समाजाविरूद्ध अपशब्द उच्चारतो ते येथील लढाऊ समाज कधीच खपवून घेणार नाही. या निवडणुकीत हाच आगरी, कोळी, आदिवासी या आमदाराची मस्ती कायमची जिरवल्याशिवाय राहणार नाही.

या सभेत बोलताना सचिन ताडफळे यांनी या थापेबाज आमदाराचे कपडेच फाडले. ते म्हणाले, याने पाच वर्षात एक काम केले नाही. पण, तरी राज्यातील मोठमोठे प्रकल्प आपणच आणल्याचे तो सांगत आहे. अरे बादली, तुझी औकात काय, तू बोलतो किती असे सुनावले. या सभेत प्रीतम म्हात्रे यांनी या खोटारड्या आमदाराच्या भूलथापांना बळी न पडता यावेळी तुमच्यातील कार्यसम्राट युवा नेतृत्वाला संधी देण्याचे आवाहन केले.

# झिराडमध्ये घरफोडी

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील झिराड येथील एका रिसॉर्टच्या दरवाजाची कडी तोडून घरफोडी करण्यात आली. लाखो रुपये किमतीचा ऐवज लंपास करण्यात आला असून, आरोपीला अवघ्या काही तासात पोलिसांनी जेरबंद केले आहे.

झिराडमध्ये होम स्टे नावाचे रिसॉर्ट आहे. शनिवारी रात्री साडेअकरा ते रविवारी पहाटेच्या सुमारास चोरट्याने रिसॉर्टमधील मुख्य दरवाजाची कडी तोडली. आतमध्ये घुसून एक लाख ३२ हजार ५० रुपये किमतीचा ऐवज चोरून नेला. याप्रकरणी रविवारी अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. पोलिसांनी पेणमधील एकाला ताब्यात घेतले. त्याची कसून चौकशी करण्यात आली. त्यावेळी त्याने हा गुन्हा केल्याचे कबूल केले. गुन्हा दाखल झाल्यावर काही तासातच पोलिसांनी आरोपीला गजाआड केल्याची माहिती पोलिसांनी दिली. याप्रकरणी मांडवा सागरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबतचा अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक सुमित खोत करीत आहेत.

## गृहमतदानासाठी प्रशासन सज्ज

# दिव्यांग, ज्येष्ठ बजावणार हक्क

**। रायगड । वार्ताहर ।**

विधानसभा निवडणुकीसाठी जिल्हा प्रशासन सज्ज झाले असून, २० नोव्हेंबरला मतदान होणार आहे. निवडणुकीसाठी प्रत्यक्ष मतदान केंद्रावर नियुक्त अधिकारी व कर्मचारी, पोलीस, लष्करी अधिकारी, जवान, दिव्यांग तसेच ८५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी टपाली मतदानाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. त्यानुसार जिल्ह्यातील सात विधानसभा मतदारसंघात मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज झाल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी यांनी दिली.





त्यानुसार १९२-अलिबाग विधानसभा मतदारसंघामध्ये दि.१५ नोव्हेंबर रोजी होणार दिव्यांग, ज्येष्ठांचे गृहमतदान पार पडणार आहे. या मतदारसंघामध्ये अलिबाग, मुरुड, रोहा तालुक्यातील पोस्टल बॅलेटकरिता ८५+ मतदार ४६१ व दिव्यांग मतदार २७ अशा मतदान करण्याकरिता पोस्टल बॅलेटसाठी १२ ड अर्ज दिले आहेत, अशी माहिती या मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी मुकेश चव्हाण यांनी आहे. गृहमतदानाकरिता ३७ पथके कार्यरत राहणार असून, ही मतदान प्रक्रिया एक दिवस सुरू राहणार असल्याचे

•➤ पान ५ वर

### पनवेलमध्ये १३७ मतदारांचे मतदान

१८८-पनवेल विधानसभा मतदारसंघात सोमवारी १३७ मतदारांनी गृहमतदानाचा हक्क बजावला, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी पनवेल पवन चांडक यांनी दिली.मतदारसंघातील रहिवासी ८५ वर्षांपेक्षा जास्त वय असलेल्या १२४ ज्येष्ठ नागरिकांनी, १३ दिव्यांग मतदार यांनी घरबसल्या मतदान केंद्रावर मतदानाचा हक्क बजावला. गोपनीय पद्धतीने मतदान करण्याची सुविधा पुरविण्यात येऊन संबंधित विधानसभा मतदारसंघाचे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली नियुक्त करण्यात आलेल्या क्षेत्रीय अधिकारी, मतदान अधिकारी तसेच मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांनी गृहमतदान प्रक्रियेत सहभाग घेतला. यावेळी ज्येष्ठ नागरिक व दिव्यांग मतदारांनी निवडणूक आयोगाचे आभार मानले.

# निवडणूक निरीक्षकांकडून मतदान केंद्रांची पाहणी



**। रायगड । वार्ताहर ।**

१९२ अलिबाग विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूक निरीक्षक (सा.) रुही खान यांनी अलिबाग विधानसभा मतदारसंघातील रोहा तालुक्यातील शेंडसई, महाळुंगे, भातसई, डोंगरी, चणेरा, आरे बुद्रुक, न्हावे, खैराले, खैरे खुर्द, खुटाळ मतदान केंद्राना भेटी देत पाहणी केली. मतदान केंद्रात अद्ययावत असणाऱ्या सर्व भौतिक सुविधेची पाहणी करुन त्रुटींबाबत सूचनादेखील केल्या. त्याचप्रमाणे श्रीमती खान यांनी अलिबाग विधानसभा मतदारसंघातील आतापर्यंत १०६ मतदार केंद्रांना भेटी देऊन पाहणी केली आहे. याप्रसंगी त्यांचे संपर्क अधिकारी उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) रवींद्र शेळके आदी उपस्थित होते.


•➤ पान ५ वर




# सत्ता बदलासाठी तुमची साथ हवी

**। परांडा । वृत्तसंस्था ।**
**राज्यात विधानसभा निवडणुकीसाठी प्रचारसभांचा धडाका सुरू असताना ज्येष्ठ नेत्यांनी कंबर कसली आहे. महाराष्ट्रातील जिल्हे अन् मतदारसंघ पिंजून काढत उमेदवार आणि मतदारांना प्रोत्साहन दिलं जातंय. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे सर्वे सर्वा शरद पवारांनी काही दिवसांपूर्वी निवृत्तीचे संकेत दिले होते. परंतु, आता त्यांनी मी म्हातारा झालोय का? असं म्हणत मतदार अन् उमेदवारांचे स्फुल्लिंग जागवलं. धाराशिव येथील परांडा येथे आयोजित प्रचारसभेत ते बोलत होते.**

## ■ शरद पवारांचे मतदारांना आवाहन



हे राज्य आणि या राज्याची सत्ता ज्यांच्या हाती आहे, त्यात महाराष्ट्राचे हित नाही. म्हणून ही सत्ता त्यांच्या हातून काढून घ्यायची आणि सत्ता परिवर्तन करायचं यासाठी मी स्वतः, उद्धव ठाकरे, राहुल गांधी आणि आम्हा सर्वांचे हजारो सहकारी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात हिंडतोय. लोकांना सांगतो आहे की सत्ता बदलायची आहे, त्यासाठी तुमची साथ हवी. यात कोणी वय, ऊन, वारा, पाऊस काही बघत नाही, असं शरद पवार म्हणाले.

खासदार ओमराजे यांनी अतिशय चांगली भूमिका मांडली. पण त्यांची एक गोष्ट मला पटली नाही. ते बोलता बोलता म्हणाले की पवार साहेब या वयातही हिंडतात. मी काय म्हातारा झालोय का? आता एक म्हातारं इथं दुसऱ्याच्या खांद्यावर बसून आलेलं. त्यामुळे मी म्हातारा झालेलो नाही. हे सरकार बदलल्याशिवाय मी स्वस्थ बसणार नाही.

या लोकांच्या हाती सत्ता देऊन तुमच्या प्रश्नांची सोडवणूक या महाराष्ट्रात होते हे बघितल्याशिवाय मी म्हातारा होणार नाही, असंही शरद पवार मिश्किलीत म्हणाले. सत्ता बदल कशासाठी आणि कोण करणार? तरी एक वर्षांपूर्वी आम्ही दिल्लीत ठरवलं की केंद्रामध्ये काही बदल करता येतील का? त्यासाठी तयार केलेल्या आघाडीचे नाव ठेवलं इंडिया आघाडी. महाराष्ट्रात लोकसभेला तुम्ही बदल केलात. या देशाची घटना तुम्ही वाचवली. घटना आणि माणसांचा अधिकार वाचवण्याचं काम तुम्ही केलं. आता विधानसभेची निवडणूक आहे. विधानसभा तुम्हा लोकांच्या विचारांच्या हाती हवी. तुम्ही जे आमदार निवडून द्याल त्यांच्या हाती सत्ता हवी. लोकांनी निवडून दिल्यानंतर त्यांचे प्रश्न सोडवता येतात, असंही शरद पवार म्हणाले.

# निवडणुकीचे काम नाकारणाऱ्या कर्मचाऱ्यांवर होणार कारवाई

**। ठाणे । वृत्तसंस्था ।**
विधानसभा निवडणूकीचे काम करण्यास नकार देणाऱ्या विविध शासकीय निमशासकीय आस्थापनातील अधिकारी कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी असे निर्देश ठाण्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अशोक शिनगारे यांनी दिले आहेत. निवडणुकीचे काम हे राष्ट्रीय कर्तव्य मानले जाते. पाच वर्षातून एकदा होणाऱ्या निवडणुकीतील या राष्ट्रीय कर्तव्यास नाकारणाऱ्या कर्मचाऱ्यांवर लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ चे कलम १३४ नुसार शिस्तभंगाची कठोर कारवाई करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदान येत्या २० नोव्हेंबर रोजी होणार आहे. ठाणे जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघात मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. तर, २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे.

ठाणे जिल्ह्यात एकूण ६ हजार ९५५ मतदान केंद्रे असून मतदान प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी एकूण ७ हजार ७१७ मतदान केंद्राध्यक्ष, ७ हजार ७१७ मतदान अधिकारी आणि १५ हजार ४३४ इतर मतदान अधिकारी अशा एकूण ३० हजार ८६८ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. परंतु अनेक कर्मचारी त्यांना प्राप्त झालेले निवडणूक कर्तव्य आदेश रद्द करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात येत असल्याचे निदर्शनास येत आहे.

तसेच यासाठी अनेकजण विविध क्षेत्रातील व्यक्तींच्या शिफारशी घेवून तसेच आजारपणाचा दाखला घेवूनही मोठ्या प्रमाणावर येत असल्याची बाब समोर आली आहे. ज्यांच्या आरोग्यविषयक अडचणी खऱ्या आहेत, त्यांच्याबाबतीत प्रशासनाने सहकार्याची भूमिका घेतली आहे. परंतू, निवडणूक प्रक्रिया पार पडण्यासाठी मनुष्यबळाची नितांत आवश्यकता असून कर्मचाऱ्यांकडून अशा पध्दतीचे वर्तन अपेक्षित नसल्याचेही जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी नमूद केले आहे.

निवडणुकीचे काम हे राष्ट्रीय कर्तव्य असून अशा प्रकारे जे कर्मचारी निवडणुकीसाठी त्यांना प्राप्त झालेले आदेश नाकारतील, निवडणूक प्रशिक्षणास गैरहजर राहतील किंवा निवडणुकीच्या कामात हयगय करतील, त्यांच्यावर लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ चे कलम १३४ नुसार थेट कारवाई करावी, असे निर्देश ठ जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी दिले आहेत.

# उमेदवाराच्या मांसाहार पार्टीत एकाचा मृत्यू

**। चंद्रपूर । वृत्तसंस्था ।**
वरोरा मतदार संघात उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित मांसाहार पार्टीत दोन मद्यधुंद कार्यकर्ते विहिरीत पडले. त्यातील एकाचा मृत्यू झाल्याने खळबळ उडाली आहे.

प्रचाराची रणधुमाळी सुरू असताना उमेदवार मतदारांना मांसाहारी व शाकाहारी पार्टी, दारू पार्टीचे प्रलोभन देत आहेत. अशा पार्टी दररोज आयोजित केल्या जात आहेत. जेवणावळीची धूमधाम सुरू असताना कार्यकर्ते दारूच्या नशेत झिंगून पडत आहेत. निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मतदारांना आकर्षित करण्यासाठी रविवारी पार्टीचे आयोजन केले होते. फतेहपूरच्या गिट्टी क्रशर कॉम्प्लेक्समध्ये मटण पार्टीचे आयोजन करण्यात आले होते, ज्यामध्ये दारूचीही व्यवस्था करण्यात आली होती. पार्टीदरम्यान मद्यधुंद अवस्थेत असलेल्या दोन कार्यकर्त्यांचा तोल गेला आणि ते जवळच्या विहिरीत पडले. अरुण महाले या एका कामगाराची वेळीच सुखरूप सुटका करण्यात आली, मात्र दुसरा कामगार गजानन काळे अद्याप बेपत्ता आहे. घटनेची माहिती मिळाल्यापासून मदत आणि बचावकार्य सुरू आहे, मात्र रात्रीचा अंधार असल्याने त्यांना विहिरीतून बाहेर काढता आले नाही. परिणामी त्याचा मृत्यू झाला.

## बंडखोरांविरोधात काँग्रेस ॲक्शन मोडवर

**मुंबई :** महाविकास आघाडीच्या विरोधात लढण्याचा निर्णय घेतलेल्या काँग्रेसच्या बंडखोरांविरोधात पक्षाने कारवाईचा बडगा उगारला आहे. काँग्रेसने राज्यातील वेगवेगळ्या मतदारसंघांमध्ये बंडखोरी करणाऱ्या १६ जणांना निलंबित केलं आहे. महाविकास आघाडीतील नेत्यांनी मनधरणी करण्याचा प्रयत्न केल्यानंतरही कसबा, शिवाजीनगर, पर्वती, गडचिरोली, भंडारा, भिवंडी, मिरा-भाईंदर, अहमदनगर शहर, कोपरी-पाचपाखाडी, यवतमाळ, राजापूर, काटोल या मतदारसंघातील बंडखोरांनी माघार घेतली नाही. अखेर पक्षाने त्यांच्यावर कारवाई केली आहे. दरम्यान, या कारवाईआधी काँग्रेसने अनेक बंडखोरांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला होता.

# अजितदादांच्या शिलेदाराची आमदारकीची वाट बिकट

**। मावळ । वृत्तसंस्था ।**
अजित पवारांचे विश्वासू आमदार सुनील शेळके यांना सहज आणि सोपी वाटणारी निवडणूक अवघड असल्याचं पाहायला मिळत आहे. माझ्यासमोर महाविकास आघाडीतील घटक पक्षाकडून आव्हानच नाही, असं म्हणणारे सुनील शेळके यांच्या विरोधात त्यांच्याच पक्षातील बंडखोर बापू भेगडे यांचं आव्हान कडवं ठरत आहे. पक्षाचा राजीनामा देऊन बापू भेगडे यांनी बंडखोरी करत शेळके यांच्यासमोर दंड थोपटले. बंडखोर बापू भेगडे यांना भाजपचे माजी राज्यमंत्री बाळा भेगडे यांचा पाठिंबा आहे.



मावळविधानसभामतदारसंघात कार्यक्षम म्हणून आमदार सुनील शेळके यांची ओळख आहे. पूर्वाश्रमी भाजपचे असलेले आमदार सुनील शेळके यांना २०१९ मध्ये उमेदवारी न मिळाल्यामुळे त्यांनी ऐनवेळी राष्ट्रवादी पक्षात उडी घेऊन उमेदवारी मिळवत माजी राज्यमंत्री बाळा भेगडे यांचा पराभव केला होता. अल्पावधीत अजित पवारांचे विश्वासू म्हणून त्यांनी ओळख निर्माण केली. वेळोवेळी आमदार रोहित पवार, खासदार सुप्रिया सुळे यांच्या विरोधात कठोर भूमिका घेऊन अजित पवारांचा विश्वास संपादन केला.

मावळमध्ये माझ्या विरोधात विरोधकांकडे निवडणुकीच्या मैदानात उतरवण्यासाठी उमेदवारच नाही. अशा भ्रमात सुनील शेळके होते. मात्र, ऐनवेळी राष्ट्रवादी अजित पवार गटाचे बापू भेगडे यांनी पक्षाला राम- राम ठोकून बंडखोरी करत उमेदवारी अर्ज भरला आणि थेट सुनील शेळके यांना आव्हान दिलं. हे नाट्य घडत असताना बापू भेगडे यांच्या पाठीमागे भाजपचे माजी राज्यमंत्री बाळा भेगडे यांचा पाठिंबा असल्याचे देखील वेळोवेळी समोर आलेलं आहे. मावळमधील अवघी भाजप भेगडे यांच्या पाठीशी असल्याचं बोललं जातं आहे. बैठक होऊन पक्ष पदाचा देखील अनेकांनी राजीनामा दिला होता. अनेकदा राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मध्यस्थी केल्यानंतरही मावळमधील महायुती परिपूर्ण होऊ शकलेली नाही.

मावळ विधानसभा मतदारसंघात सहज निवडून येऊ अशी भाबडी आशा बाळगणारे सुनील शेळके यांना बापू भेगडे यांचं आव्हान मिळाल्यानंतर मतदारसंघ पिंजून काढण्याची वेळ आली आहे. मतदानाला अवघे काही दिवस शिल्लक असताना अद्यापही शेळके यांच्या प्रचारासाठी महायुतीतील कुठलाही मोठा नेता आलेला नाही. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी देखील या मतदारसंघापासून दूर राहणे पसंत केले आहे. अजित पवारांनी पिंपरी- चिंचवड शहरात बैठक घेतली. परंतु, मावळमध्ये ते गेले नाहीत. ही सर्व राजकीय गणितं पाहिल्यानंतर २३ तारखेला मावळची जनता कोणाला कौल देणार हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

शरद पवार यांनी देखील आमदार सुनील शेळके यांच्यावर वक्तव्य करत तंबी दिली होती.

# मतांसाठीच दलित, आदिवासी हिताची भाषा

## काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांचा आरोप

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**
पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या मंत्रिमंडळात अनुसूचित जाती- जमातीच्या नेत्यांना गौण स्थान आहे. राज्यमंत्री करून अनेकांची बोळवण केली आहे. एकाही दलित नेत्याला चांगले खाते, मंत्रिपद दिलेले नाही. मोदी केवळ मतांसाठीच दलित, आदिवासी हिताची भाषा बोलतात, असा आरोप काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी केला.



महाविकास आघाडीचा जाहीरनामा महाराष्ट्रनामा प्रकाशनाच्या कार्यक्रमात मल्लिकार्जुन खरगे बोलत होते. या वेळी ज्येष्ठ काँग्रेस नेते अशोक गेहलोत, सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल, महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरद पवार) नेत्या खासदार सुप्रिया सुळे, माजी खासदार वंदन चव्हाण, शिवसेना नेते खासदार संजय राऊत, खासदार अरविंद सावंत आदी उपस्थित होते.

### मोदींकडूनच लाल रंगाची राज्यघटना भेट

**राहुल गांधी यांनी राज्यघटनेचे लाल रंगाचे पुस्तक दाखवले तर त्यांच्यावर शहरी नक्षलवादी म्हणून टीका केली जाते. पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीच तत्कालीन राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांना लाल रंगाचे राज्यघटना भेट म्हणून दिले होते. त्यावेळेचा फोटो दाखवून खरगे यांनी भाजप व नरेंद्र मोदी यांच्या टिकेचा समाचार घेतला. आमचे सरकार लोकशाहीवादी विचाराचे आणि शिव,शाहू, फुले, आंबेडकरांच्या विचाराचे असेल, असा दावाही त्यांनी केला.**

रामनाथ कोविंद यांना राष्ट्रपती करून दलितांची आणि आता द्रौपदी मुर्मू यांना राष्ट्रपती केल्याचे सांगून आदिवासींची मते मिळविण्याचा प्रयत्न मोदींनी केला. पण प्रत्यक्षात मोदींच्या मंत्रिमंडळात दलित, अदिवासी, मागासवर्गीयांना स्थान नाही. मोदींच्या मंत्रिमंडळात अनुसूचित जाती- जमातीच्या नेत्यांना अत्यंत गौण स्थान आहे. एकाही दलित नेत्याला चांगले खाते दिलेले नाही. मोदी फक्त दलित हिताच्या घोषणा करतात, प्रत्यक्षात दलितांना दुय्यम वागणूक देतात, असा आरोप खरगे यांनी केला.

## ‘सक्रिय राहून पक्ष बांधणी करणार’

**मुंबई :** राजकारणातून मी अजिबात निवृत्त होणार नाही. संसदीय कामकाजाऐवजी मी संघटनेचे काम करणार आहे. राजकारणात एक नवी पिढी तयार करायची आहे. जी महाराष्ट्राच्या हिताचे पुढील ५० वर्षांचे नियोजन करेल, असे शरद पवार म्हणाले. या विधानसभा निवडणुकीत तरुण पिढीला पुढे आणण्याच्या दृष्टीनेच उमेदवारी दिली आहे. यात तासगाव येथून दिवंगत आर. आर. पाटील यांचे पुत्र रोहित पाटील, आमच्या कुटुंबातील उच्च शिक्षित युगेंद्र पवार, रोहित पवार असे तरुण राजकारणात आले आहेत. पुढील काळात देखील तरुण पिढीला राजकारणात संधी देण्यासाठी नियोजन केले जाईल, असे पवार म्हणाले.

# धाकट्यासाठी थोरला प्रचाराच्या मैदानात

**। लातूर । वृत्तसंस्था ।**
काँग्रेसचे धीरज विलासराव देशमुख यांच्या प्रचाराला आता रंगत आली असून त्यांचे ज्येष्ठ बंधू आणि सिनेस्टार रितेश देशमुख सुद्धा त्यांच्याकरता प्रचाराच्या मैदानात उतरले आहेत. रितेश देशमुख यांनी सत्ताधाऱ्यांवर निशाणा साधत एक लाखांपेक्षा जास्त लीडने धीरज देशमुख यांना निवडून द्या, असं आवाहन केलं आहे. त्यांनी लय भारी चित्रपटातील काही वाक्ये, तर बिग बॉसचा विजेता सुरज चव्हाण याचेही डायलॉग उपस्थित प्रेक्षकांना ऐकवले.



रितेश देशमुख म्हणाले, हा जो जनसागर आहे, ती खरं म्हणजे लीड आहे. महिला मेळाव्यातच विजय निश्चित झाला होता. धीरज विलासराव देशमुख यांच्या लीडची ही सभा आहे. लय भारी कार्यक्रम धीरजने केला. खरं म्हणजे लोकांचे प्रश्न सोडवण्याची जबाबदारी असते, गेल्यावेळी भाषणात म्हणालो होतो की या गड्याला मतदान करा. १ लाख मतांनी तुम्ही मतदान केलं होतं. गेल्या ५ वर्षांपासून धीरजने प्रामाणिकपणे काम केलंय. लोकांसाठी काम करण्याची चळवळ. लोकांच्या डोळ्यांतील अश्रू पुसायचे आहेत. आई बहिणींचा त्रास कमी करायचा आहे. लातूर पॅटर्नमध्ये युवक शिक्षण घेत आहेत. पण रोजगार आहे का तुमच्या हातात. हा रोजगार देण्याची जबाबदारी सरकारची आहे. आहे का तुमच्याकडे रोजगार. पिकपाण्याला भाव आहे का? असे प्रश्न विचारून त्यांना सरकारवर टीका केली.

वर्षी १ लाखाची लीड होती, यावेळी एवढ्या जोरात बटण दाबा की पुढच्या वेळेचं डिपोझिट आत्ताच जप्त झालं पाहिजे. विधानसभेला झापूक झुपूक वारं झालेलं आहे. त्यामळे काहीही काळजी करू नका. आता समोर गुलिगत धोका आहे. सावधान राहा. त्या धोक्याला बळी पडू नका. आपला उमेदवार चांगला आहे. आता बुक्कीत नाही, बटणावर टेंगूळ द्यायची वेळ आलीय, असं रितेश देशमुख म्हणाले.

# विकास केलात तर दारोदारी का फिरता

## ■ पारकर यांची राणेंवर टीका

**। कणकवली । वृत्तसंस्था ।**
मूठभर ठेकेदार, कार्यकर्त्यांचे आणि स्वत:चे खिसे भरण्याव्यतिरिक्त राणे कुटुंबियांनी कसलाही विकास केलेला नाही. टक्केवारी लाटण्यासाठीच राणे निधी आणल्याचा दिखावा करत आहेत, असा आरोप महाविकास आघाडीचे उमेदवार संदेश पारकर यांनी केला. राणे यांनी विकास केला असेल तर त्यांना मतांसाठी दारोदार का भटकावे लागते? जनतेमध्ये दहशत निर्माण का करावी लागतेय, तसेच इथल्या तरूणांना, आजारी रूग्णांना उपचारासाठी जिल्ह्याबाहेर का जावे लागतेय? असा प्रश्नही पारकर यांनी केला.

तालुक्यातील कनेडी येथे पारकर यांची सभा झाली. यावेळी माजी खासदार विनायक राऊत, सुशांत नाईक, उत्तम लोके यांच्यासह शिवसेना ठाकरे पक्ष तसेच महाविकास आघाडीचे पदाधिकारी उपस्थित होते. पारकर म्हणाले,कणकवली मतदारसंघात येणाऱ्या ग्रामीण भागातील रस्त्यांची स्थिती अजूनही दयनीय आहे. अनेक गावांतील स्ट्रीट लाईट नाहीत. नळपाणी योजना बंद आहेत. गेली ३५ वर्षे राणे कुटुंबिय सत्तेत आहे. पण, त्यांना रस्ते, पाणी, वीज, शिक्षण, आरोग्य यांसारख्या मुलभूत सुविधा सोडवता आलेल्या नाहीत. ते पुढे म्हणाले, राणेंनी स्वत:चे मेडिकल कॉलेज आणले. पण, त्याचा सर्वसामान्य रूग्णांना काय फायदा झाला. गंभीर आजारी किंवा अपघातामध्ये जखमी झालेल्या रूग्णांना अजूनही गोवा येथेच पाठवावे लागते. मंत्री, मुख्यमंत्री ते केंद्रीय मंत्री झालेल्या राणेंना ३५ वर्षात किमान एक हजार तरूणांना रोजगार देता येईल, असा एकही उद्योग आणता आला नाही. उलट स्वत:च पेट्रोल पंप, हॉटेल व इतर व्यवसाय राणेंनी उभे केले.

कोट्यवधी रूपयांचा निधी आणल्याचे राणे सांगत आहेत. तशी वस्तुस्थिती असेल तर नितेश राणे यांनी या विकास निधीतून किती विकास कामे झालीत हे जाहीर करावे. विकास कामे केल्याची दवंडी पिटणाऱ्या राणेंनी माझ्यासोबत यावे. मी त्यांना गावागावात फिरवून इथले खराब रस्ते, बंद नळपाणी योजना, अपुऱ्या वैद्यकीय सुविधा दाखवतो, असे पारकर म्हणाले.

## ‘तेलींना मदतीचे श्रेष्ठींकडून आदेश’

**सावंतवाडी :** शरद पवार यांनी भेटीदरम्यान आम्हाला आदेश दिले आहेत. काही झाले तरी आम्हाला राज्यात सत्ता आणायची आहे. त्यामुळे राजन तेली यांना निवडून द्यायचे आहे. सर्वांनी त्यांना निवडून आणण्यासाठी एकदिलाने काम करा, असे आवाहन माजी राज्यमंत्री प्रवीण भोसले यांनी केले. राष्ट्रवादीच्या माध्यमातून अर्चना घारे यांनाच संधी देण्यात येणार होती; मात्र जागा वाटपात ही जागा ठाकरे शिवसेनेला सुटली. पक्ष नेतृत्वाचा आदेश ऐकून त्यांनी थांबणे गरजेचे होते; मात्र नेत्यांचा अपमान करून घारे यांनी खूप घाई केली, अशी नाराजीही त्यांनी व्यक्त केली. महाविकास आघाडीचे उमेदवार राजन तेली यांच्या तिरोडा येथील प्रचाराच्या पार्श्वभूमीवर आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी पाटेकर देवस्थानात भोसले घराण्याकडून ढोलताशांच्या गजराज तेली यांचे स्वागत करण्यात आले. राजन तेली हे उच्चविद्याभूषित आणि प्रशासनाची जाण असलेले नेते आहेत. त्यांना येथील जनतेने निवडून द्यावे. शरद पवार यांनीही त्यांच्यावर विश्वास टाकला आहे. त्यांनी केलेल्या अभ्यासात सावंतवाडी मतदारसंघात तेली हेच निवडून येणार, असे प्रवीण भोसले म्हणाले.

# संजयकुमार वर्मा यांच्या नियुक्तीबाबत हस्तक्षेप करा

## नाना पटोले यांची निवडणूक आयोगाकडे मागणी

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**
महाराष्ट्र सरकारने संजयकुमार वर्मा यांची पोलिस महासंचालक म्हणून केलेली सशर्त नियुक्ती ही घटनात्मक तरतुदी, सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश आणि स्थापित प्रशासकीय तत्वे यांचे उघडउघड उल्लंघन आहे. यामुळे पोलीस महासंचालकांना निवडणुकीच्या काळात तटस्थ आणि निष्पक्षपणे काम करण्यात अडचणींचा सामना करावा लागेल.

त्यामुळे निवडणूक आयोगाने आपल्या अधिकारांचा वापर करून संजयकुमार वर्मा यांच्या तात्पुरत्या नियुक्तीच्या आदेशावर त्वरित निर्णय घ्यावा, अशी मागणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.

निवडणूक प्रक्रियेदरम्यान पोलीस दलाची निष्पक्ष आणि तटस्थ भूमिका असावी यासाठी ही नियुक्ती केली होती; परंतु निवडणूक आयोगाच्या या निर्देशाचे उल्लंघन करत महाराष्ट्र सरकारने संजयकुमार वर्मा यांची नियुक्ती आचारसंहितेपर्यंतच करणारा आदेश काढला. सर्वोच्च न्यायालयाने प्रकाशसिंह प्रकरणी ऐतिहासिक निकाल देताना पोलीस महासंचालकांच्या नियुक्तीसाठी जी मार्गदर्शक तत्त्वे, योग्यता आणि राजकीय प्रभावापासून संरक्षण यासंबंधीचे स्पष्ट निर्देश दिलेले आहेत, त्याचेही सरकारने उल्लंघन केलेले आहे. संजयकुमार वर्मा यांच्या सशर्त नियुक्तीमुळे पोलीस दलाचे नेतृत्व आणि प्रशासकीय सातत्य धोक्यात येते. रश्मी शुक्ला यांना निवडणुकीनंतर पुन्हा या पदावर नियुक्त करण्याचा राज्य सरकारचा इरादा असेल, तर तो कायदेशीर आणि प्रशासकीय गुंतागुंत निर्माण करणारा ठरू शकतो. सशर्त अटीमुळे पोलीस महासंचालकांच्या कार्यक्षम तेवरही परिणाम होऊ शकतो. निवडणूक काळापुरते महासंचालकआणिनिवडणुकीनंतरचेमहासंचालक अशा नियुक्तीमुळे प्रशासनाबाबतची मूलभूत घटनात्मक तत्त्वे, पदानुक्रम आणि अधिकाराचे पृथक्करण यावर परिणाम होतो. सरकारच्या या कृतीमुळे घटनात्मक संतुलनाला बाधा पोहोचून कायदेशीर अनिश्चितता उद्भवू शकते. त्यामुळे या निर्णयात निवडणूक आयोगाने हस्तक्षेप करावा, अशी मागणी नाना पटोले यांनी केली आहे.

# उमेदवारांचा खर्च : काटकसर अन् मोकळा हात

**। नागपूर । वृत्तसंस्था ।**
विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारांना खर्च मर्यादा निश्चित करून देण्यात आली असून त्यावर निवडणूक आयोगाचे लक्ष आहे. त्यामुळे प्रत्येक उमेदवाराला त्यांच्या निवडणूक खर्चाचा तपशील सादर करावा लागतो. पहिल्या आठवड्याच्या तपशिलानुसार काही उमेदवारांनी खर्चात हात मोकळा सोडल्याचे व काहींनी काटकसर केल्याचे दिसून येते.

नागपूर शहरातील सहा मतदारसंघात खर्चात सर्वात आघाडीवर दक्षिण नागपूरचे काँग्रेस उमेदवार गिरीश पांडव आहेत. त्यांच्या पाठोपाठ उत्तर नागपूरमधील भाजप उमेदवार डॉ. मिलिंद माने व मध्य नागपुरातील प्रवीण दटके यांचा क्रमांक लागतो. सर्वात कमी खर्च मध्य नागपुरातील काँग्रेस उमेदवार बंटी शेकळे यांचा असून त्यानंतर पश्चिम नागपूरमधील भाजप उमेदवार सुधाकर कोहळे यांचा क्रमांक आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा खर्च ५० हजारांपेक्षा किंचित अधिक आहे.

आयोगाला सादर केलेल्या पहिल्या टप्प्यातील खर्चाच्या तपशिलानुसार दक्षिण नागपूरमधील काँग्रेस उमेदवार गिरीश पांडव (६ लाख ५६ हजार), त्यांचे प्रतिस्पर्धी भाजपचे मोहन मते (१ लाख ५४ हजार) यांनी खर्च केला आहे. उत्तर नागपूरचे भाजप उमेदवार डॉ. मिलिंद माने (४ लाख १७ हजार) त्यांचे प्रतिस्पर्धी काँग्रेसचे नितीन राऊत (२ लाख २८ हजार) यांचा खर्च मानेंच्या निम्मे आहे, पूर्व नागपूरमध्ये राष्ट्रवादीचे (शरद पवार) दुनेश्वर पेठे यांनी खर्चात आघाडी घेतली आहे. कृष्णा खोपडे (१ लाख ६० हजार), दक्षिण- पश्चिममध्ये भाजप उमेदवार देवेंद्र फडणवीस यांनी ६४ हजार रुपये खर्च केले आहे. त्यांचे प्रतिस्पर्धी काँग्रेसचे प्रफुल्ल गुडधे यांनी २ लाख ९१ हजारांचा खर्च दाखला. पश्चिम नागपूरमध्ये काँग्रेस उमेदवार विकास ठाकरे यांनी १ लाख तर भाजपचे सुधाकर कोहळे यांनी ५४ हजारांचा खर्च दाखवला आहे.मध्य नागपूरात भाजप उमेदवार प्रवीण दटके यांनी विरोधकांच्या तुलनेत खर्चात बरेच आघाडीवर आहेत.

### दुसऱ्या टप्प्यातील तपासणी

**दक्षिण-पश्चिम, दक्षिण, नागपूर पूर्व, मध्य, पश्चिम व उत्तर (अ.जा) या मतदारसंघातून निवडणूक लढवणाऱ्या उमेदवाराचे दुसऱ्या टप्प्यातील खर्च लेखे तपासणी सोमवारी सकाळी १० ते ५ या वेळात बचत भवन जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर येथे तर ग्रामीणमधील सर्व मतदारसंघाची खर्च लेखे तपासणी सरपंच भवनात केली जाणार आहे. या बैठकीस सर्व निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांनी आवर्जून उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.**

# जांभळे यांचा शेकापच्या अतुल म्हात्रेंना पाठिंबा

**गडब :** रायगड जिल्हा परिषदेचे माजी अर्थ व बांधकाम सभापती संजय जांभळे यांनी पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते. यावेळी जांभळे यांनी आपल्या कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत पेण विधानसभेचे शेतकरी कामगार पक्षाचे तथा महाविकास आघाडीचे उमेदवार अतुल म्हात्रे यांना पाठिंबा जाहीर केला केला आहे.



यावेळी जांभळे म्हणाले की, २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत आम्ही जीवाचे रान करून विद्यमान आमदार रवीशेठ पाटील यांना विजयी केले होते. परंतु, गेल्या पाच वर्षात त्यांनी मतदारसंघात दुर्लक्ष केले. अतुल म्हात्रे यांना राष्ट्रवादी शरद पवार गट, काँग्रेस यांचा पाठिंबा आहे. तसेच, त्यांच्या बॅनरवर बाळासाहेब ठाकरे, उद्धव ठाकरे यांचे फोटो आहेत. यामुळे तेच महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार असल्याने आम्ही त्यांना जाहीर पाठिंबा देत असून प्रचारात त्यांच्यासोबत राहून त्यांना विजयी करण्यासाठी शर्थीचे प्रयत्न करणार असल्याचे देखील संजय जांभळे यांनी यावेळी बोलताना सांगितले. पुढे बोलताना ते म्हणाले की, प्रसाद भोईर यांनी उमेदवारी मिळावी यासाठी शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षात प्रवेश केला होता. यामुळे शिवसेनेतील इच्छुक उमेदवारांच्या नाराजीचा फटका त्यांना बसू शकतो. अतुल म्हात्रे हे लंडनमध्ये उच्चशिक्षण घेऊन आले आहेत. एमएमआरडीए प्रकल्पाबाबत त्यांचा सखोल अभ्यास आहे. बेरोजगारी, रोजगार याबाबत त्यांचे व्हिजन चांगले आहे. यामुळेच या तरुण उमेदवाराच्या पाठीशी राहण्याचा निर्णय घेतला असल्याचे त्यांनी सांगितले.

# नारीशक्तीची साथ हीच विजयाची पोच पावती : पुष्पलता जगताप



**महाड :** महाड विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीच्या उमेदवार स्नेहल जगताप यांच्या प्रचारार्थ महाड शहरामध्ये सूर्यकांत शिळीमकरसर व भाऊ चव्हाण यांच्या मार्गदर्शना खाली प्रचार फेरी पार पडली. यावेळी बोलताना बंटी पोटफोडे म्हणाले की, महाडच्या विद्यमान आमदारांना चौथ्या बॉलवर क्लीन बोल्ड करून स्नेहल जगताप या पहिल्या महिला आमदार होणार असल्याच्या विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. तर, प्रचार फेरीला मिळणारा प्रतिसाद ही विजयाची पोच पावती म्हणावी लागेल. यावेळी मतदारांनी दृढ निश्चय केल्यामुळे परिवर्तन निश्चित होणार असल्याचे प्रतिपादन पुष्पलता जगताप यांनी केले आहे. महाड शहरातील काकरतेळे कोटेश्वर तळे, सुंदर वाडी फ्लॉवर व्हॅली, समता नगर, गुलमोहर सोसायटी, भीमनगर आणि परिसरात शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाच्या उमेदवार स्नेहल जगताप यांच्या प्रचारार्थ पुष्पलता जगताप यांनी प्रचार फेरीचे आयोजन केले होते. यावेळी शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे आजी-माजी पदाधिकाऱ्यांसह पुष्पलता जगताप, संध्या जगताप, बंटी पोटफोडे, सुदेश कलमकर, संदीप जाधव, रणजित साळी, मंगेश देवरुखर, हेमंत चांदळेकर, सुषम यादव, मयुरी शेडगे, तृप्ती रत्नपारखी, अस्मिता शिंदे, पूजा गोविलकर, अक्षय दळवी, राक्षे बंधू तसेच पदाधिकारी उपस्थित होते.



# बेलोशीत चिऊताई यांचे जल्लोषात स्वागत





**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अलिबाग-मुरूड आणि रोहा विधानसभा मतदार संघातील महाविकास आघाडी पुरस्कृत शेतकरी कामगार पक्षाच्या उमेदवार चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांचा बेलोशी परिसरात प्रचार करण्यात आला. चिऊताई यांचे बेलोशीसह अनेक गावांमध्ये आगमन होताच त्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. यावेळी फटाक्यांची आतषबाजी व घोषणाबाजी करीत कार्यकर्ते व मतदारांनी अलोट गर्दी केली. कार्यकर्त्यांच्या गर्दीने संपूर्ण परिसर गजबजून गेला होतो.

तालुक्यातील बेलोशी, घोटवडे, खानाव, बामणगांव आदी गावांमध्ये रविवारी (दि.१०) सायंकाळी चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांच्या प्रचाराला सुरुवात झाली. बेलोशीतून प्रचाराला सुरुवात करण्यात आली. दरम्यान चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांचे गावांमध्ये आगमन होताच फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. त्यांनी गावांतील मंदिरात जाऊन दर्शन घेऊन प्रचाराचा नारळ फोडला. प्रचारादरम्यान, चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई





यांनी शेकापचे ज्येष्ठ कार्यकर्ते अनंत पाटील यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी कार्यकर्ते व महिलांशी संवाद साधून शिट्टी चिन्हा समोरील बटण दाबून निवडून देण्याचे आवाहन केले. अलिबाग तालुक्यातील रामराज येथे देखील चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांचा प्रचार दौरा आयोजित करण्यात आला होता. रामराज स्थानकाजवळ त्यांचे आगमन होताच, त्याठिकाणीदेखील फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. बेलोशीतील सतिश वारगे यांच्या निवासस्थानी सभा घेण्यात आली. यावेळी चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधला. यानंतर घोटवडे, खानाव, बामणगाव आदी गावांमध्ये जाऊन चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांनी कार्यकर्त्यांची भेट घेतली. यावेळी महिला, तरुण मंडळी ज्येष्ठ कार्यकर्ते स्वयंस्फूर्तीने सहभागी झाले होते. एक वेगळा उत्साह या निमित्ताने दिसून आला. चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांना उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. यावेळी शेकापचे तालुका चिटणीस अनिल पाटील यांच्यासह बेलोशी, घोटवडे, खानाव, बामणगावमधील कार्यकर्ते, महिला तरुण वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुरुडमध्ये घुमतोय शिट्टीचा आवाज




**कोर्लई :** आगामी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीची सर्वत्र रणधुमाळी सुरू झाली आहे. यातच मुरुडमध्ये अलिबाग-मुरुड आणि रोहा विधानसभा मतदार संघाच्या महाविकास आघाडी पुरस्कृत शेतकरी कामगार पक्षाच्या उमेदवार चित्रलेखा नृपाल पाटील उर्फ चिऊताई यांच्या प्रचार कार्यालयाचे उद्‌घाटन करण्यात आले. उद्‌घाटन सोहळा शिवसेना (उद्धव ठाकरे) उपजिल्हाप्रमुख प्रशांत मिसाळ यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी शिवसेनेचे प्रमोद भायदे, आदेश दांडेकर, प्रशांत कासेकर, कुणाल सतविडकर, मनोहर बैले, मनोहर मकू, चंद्रकांत कमाने, अमित गोंजी, नरेश कुबल, मुग्धा जोशी, माई सुभेदार, उत्कर्षा धोत्रे, काँग्रेसचे अस्लम हलडे, नाना गुरव, इस्माईल शेख, शेतकरी कामगार पक्षाचे वामन चुनेकर, विजय गिद्दी, तुकाराम पाटील, चंद्रकांत कमाने, मनीष माळी, प्रयास वरसोलकर, प्रकाश मयेकर, यश पाटील यांसह महाविकास आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येन उपस्थित होते.

# प्रीतम म्हात्रेंचा जोरदार प्रचार

**। उरण । प्रतिनिधी ।**



उरण शहरामध्ये शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार प्रीतम म्हात्रे यांच्या प्रचारार्थ रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीमध्ये शेकापचे चिन्ह असलेल्या शिट्टीचा जोरदार प्रचार करण्यात आला. आनंद नगरमधून निघालेली रॅली उरण करंजा रस्ता, खिडकोली नाका, बक्षी कॉम्प्लेक्स, जरीमरी मंदिर मोहल्ला, राजपाल नाका, फुल मार्केट, वैष्णवी हॉटेल, सातराटी, कामठा परिसर ते कामगार वसाहतीपर्यंत नेण्यात आली.

यावेळी उरण मधील औद्योगीकरणांमध्ये नोकऱ्यांना संधी तसेच शहरातील पिण्याचा पाण्याचा प्रश्न सोडवायचा असेल तर प्रीतम म्हात्रेच प्रीतम म्हात्रेच आमदार हवेत, अशी भावना येथील जनतेने प्रचारादरम्यान बोलून दाखवली. या रॅलीत दुकानदार व नागरिकांनी प्रीतम म्हात्रे यांचे जल्लोषात स्वागत केले. यावेळी शेकापचे चिन्ह असलेल्या शिट्टीच्या आवाजाने सर्व परिसर दुमदुमून गेला होता.

रॅलीसाठी शेतकरी कामगार पक्षाचे शहर चिटणीस शेखर पाटील, तालुका महिला आघाडी अध्यक्ष सीमा घरत, पदाधिकारी शंकर भोईर, माजी नगरसेविका लता पाटील, संघटिका सुप्रिया म्हात्रे, लक्ष्मीबाई कांबळे, उपाध्यक्ष रंजना पाटील, दीपा कोळी, सलीम बॅटरी, अशोक कोळी, लहू शिंदे, राजश्री मुंबईकर, सनी म्हात्रे, हितेश जोशी, ओविस पटेल, प्रिया शहा, कुंदन पाटील, विलास बर्गे, लता वारीक, प्रियांका पाटील तसेच शेकापचे कार्यकर्ते व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# महाराष्ट्र मच्छीमार सेनेचा पाठिंबा



**। उरण । प्रतिनीधी ।**

उरण विधानसभा मतदारसंघातील शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार प्रीतम म्हात्रे यांना महाराष्ट्र मच्छिमार सेनेने पाठिंबा दिला आहे. तसे पत्र त्यांनी जे. एम. म्हात्रे यांना दिले आहे.

कोळी बांधवांच्या अनुसूचित जमातीचे दाखले, वैधता प्रमाणपत्र, मत्स्य व्यवसायास उर्जित अवस्था आणण्यासाठी सकारात्मक धोरण, जलप्रदूषण, कोळीवाड्यांचे गावठाण, सीमांकन, मच्छी मार्केटचे आधुनिकीकरण, रोजगार स्वयंरोजगारासाठी स्थानिक भूमिपुत्र म्हणून प्रथम प्राधान्य देणे, सुसज्ज बंदरे, शीतगृहे, डीजल परतावा, कोळीवाड्यातील रस्ते, पाणी, आरोग्य विषयक मूलभूत गरजा तसेच आई एकविरा देवस्थान ट्रस्ट वेहेरगाव या शासकीय संस्थेवर रायगड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व, सागरी किनारपट्टीवर होणाऱ्या प्रकल्पासंदर्भात स्थानिक भूमिपुत्रांचा जन्मताचा आदर करणे आणि कोळी जमातीच्या सर्वांगीण हिताच्या मागण्या संदर्भात सकारात्मक ठोस अभिवचन मिळाल्यामुळे विधानसभा क्षेत्रातील कोळी समाज बांधव, महाराष्ट्र मच्छीमार सेनेच्यावतीने प्रीतम म्हात्रे यांना पाठिंबा देण्यात आला आहे. यावेळी मुख्य संघटक मंगेश कोळी, संतोष पाटील, सिताराम नाखवा माजी जिल्हा परिषद सदस्य उपस्थित होते.

# तरूणांसाठी रोजगाराची निर्मिती करणर

## प्रीतम म्हात्रे यांची ग्वाही



**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील विधानसभा मतदार संघातील महाविकास आघाडी पुरस्कृत शेतकरी कामगार पक्षाचे अधिकृत उमेदवार प्रीतम म्हात्रे यांचा पनवेलमध्ये प्रचाराचे आयोजन करण्यात आले होते. या निमित्ताने उमेदवार प्रीतम म्हात्रे यांच्याशी कृषीवलने संवाद साधला असता, त्यांनी अनेक विषयांवर भाष्य केले. या मतदारसंघातील तरुणांसाठी रोजगाराची निर्मिती तसेच येथे येऊ घातलेल्या विकास प्रकल्पात येथील तरुणांना प्रशिक्षणाअभावी नोकऱ्या मिळू शकत नाहीत. यासाठी त्यांना योग्य प्रशिक्षण देण्याचे काम केले जाईल. यातून त्यांना नोकरीची संधी मिळेल, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच, गरीब गरजू आणि सर्वच लोकांसाठी परिपूर्ण काम करायचे आहे. गरिबांच्या ज्या काही छोट्यामोठ्या गरजा आहेत, त्या सर्व गरजा पूर्णत्वास नेण्याचा नेहमीच प्रयत्न केला जाईल. एकंदरीत या मतदार संघात सर्वच तरुणांचा खूप मोठा आधार आहे. ते सुशिक्षित आहेत. त्यांच्या काही अपेक्षा आहेत. या अपेक्षा नक्कीच पूर्ण करण्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली. दरम्यान, प्रीतम म्हात्रे यांनी सोसायट्यांना तसेच येथील सर्वसमान्य जनतेला भेडसावणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी या निवडणूकीत आपल्याला संधी देण्याची विनंती केली. यावेळी प्रीतम म्हात्रे यांच्या प्रचारात कृउबा समितीचे सभापती नारायण घरत, शेकापचे नरेश घरत, काशिनाथ पाटील, रवी घरत, विकास नाईक, सीमा घरत, शुभांगी पाटील, सुरेश पाटील, अविनाश भगत, रमाकांत पाटील, संतोष घरत, रमाकांत म्हात्रे, राजेश केणी, संतोष जंगम, मयूर सुतार, नितीन म्हात्रे, प्रफुल्ल खारपाटील, अरुण पाटील, भास्कर ठाकूर, दामोदर मुंबईकर, जगदीश ठाकूर, वसंत म्हात्रे, प्रशांत खारपाटील, अनंत नारंगीकर, प्रदीप ठाकूर, सतीश पाटील, अमित मुंबईकर, दीपक कातकरी आदींसह कार्यकर्ते आणि स्थानिक नेते सहभागी झाले होते.

# ताराबंदर येथील कार्यकर्त्यांचा शेकापमध्ये प्रवेश

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

शिंदे गटातील कारभाराला कंटाळून ताराबंदर येथील असंख्य कार्यकर्त्यांनी शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला आहे. शेकापचे वामन चुनेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पक्ष प्रवेश सोहळा पार पडला. नवनिर्वाचित कार्यकर्त्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून रविवारी (दि.१०) अभय पंढर, राहूल पंढर, मंदार साक्षीकर, साहिल नागोजी, निखील कोटकर, रोशन पंढर, सौरभ नागोजी, सुजय गोगर, पंकज भोईनकर आदी शिंदे गटातील कार्यकर्त्यांनी शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला. नवनिर्वाचित सर्व कार्यकर्त्यांचे पुष्पगुच्छ व शेकापचे लाल मफलर देऊन स्वागत करण्यात आले. शिंदे गटातील तरुण युवकांनी शेकापमध्ये प्रवेश केल्याने ऐन निवडणुकीत शिंदे गटातील आमदारांना फटका बसण्याची शक्यता वर्तविली जात आहे. यावेळी मुरूडमधील शेकापचे ज्येष्ठ कार्यकर्ते विजय गिदी, सदानंद पाटील, भारती बंदरी, शेकापचे कार्यकर्ते उपस्थित होते.











● अलिबाग-मुरूड आणि रोहा विधानसभा मतदार संघातील मविआ पुरस्कृत शेकापच्या उमेदवार चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांच्या प्रचारार्थ चणेरा विभागात प्रचार दौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते.

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)

# नॅरेटिव्ह म्हणजे काय?

नॅरेटिव्ह हा इंग्रजी शब्द आहे. त्याचा मराठीत अर्थ होतो कथा किंवा कथन. कथा ही मुळातच रचलेली गोष्ट असते. म्हणजे ती खरी, खोटी किंवा अर्धखोटी असू शकते. पानिपतच्या लढाईत मराठे का हरले याच्या वेगवेगळ्या कथा आहेत. काहींच्या मते मराठी सैनिक घाबरून पळाले किंवा अन्य काहींच्या मते पेशव्यांकडे लढाऊ सैनिकांपेक्षा उत्तरेत तीर्थयात्रेला गेलेल्या बाजारबुणग्यांची संख्या जास्त होती. ते काहीही असो, आजवर पानिपत होणे म्हणजे पराभव होणे हा अर्थ मराठीत रूढ होता. पण अलिकडे सदानंद मोरे वगैरेंसारखे लेखक पानिपतात आपण हरलो हे खरे नाही, असा दावा करतात. हे नवीन कथन ऊर्फ नॅरेटिव्ह झाले. जुन्या आणि नव्या या दोन्ही कथनांमध्ये थोडे-थोडे सत्य आहे. गोष्टी कशा मांडल्या व पाहिल्या जातात यानुसार त्यांचे निष्कर्ष बदलतात. गेल्या काही काळापासून आपल्या राजकारणात भाजपने नॅरेटिव्ह हा शब्द प्रचारात आणला. लोकसभा निवडणुकीत इंडिया आघाडीच्या खोट्या नॅरेटिव्हमुळे आपल्या जागा कमी झाल्या असा दावा भाजपचे नेते करतात. चारशेपार जागा आल्या तर भाजप राज्यघटना बदलेल आणि दलितांचे आरक्षण काढून घेईल अशी भीती काँग्रेसने लोकांमध्ये निर्माण केली असे त्यांचे म्हणणे आहे. वास्तविक, पूर्वापार भाजपचा राखीव जागांना विरोध राहिलेला आहे. आजही खासगीत बोलताना संघाचे कार्यकर्ते आणि भाजपवाले राखीव जागांमुळे देशाची वाट लागली असे बोलतात. एकेकाळी आरक्षणामुळे नोकरी मिळालेल्यांना सरकारचे जावई असे म्हणून हेच लोक हिणवत असत. मंडल आयोगाला विरोध करण्यात भाजपचे कार्यकर्ते पुढे होते. यांच्याच एका गोस्वामी नावाच्या कार्यकर्त्याने दिल्लीत मंडलच्या विरोधात स्वतःला पेटवून घेतले होते. २०१४ नंतर वेळोवेळी मोहन भागवतांपासून इतर अनेकांनी राखीव जागांच्या फेरविचाराबाबत मते मांडली होती. लोकसभा निवडणुकांपूर्वी भाजपच्याच अनेक नेत्यांनी घटना बदलण्यासाठी आम्हाला बहुमत हवे आहे असे म्हटले होते.

## दलित, मुस्लिमांबद्दल द्वेष

त्याच आधारे दलित समाजात ही भावना तयार झाली. मुस्लिमांनीही या नॅरेटिव्हमुळे काँग्रेसला एकगठ्ठा मतदान केले असे भाजपचे म्हणणे आहे. ते तर अधिकच हास्यास्पद आहे. भाजपने सतत मुस्लिमांचा द्वेष केला. लोकसभा निवडणूक प्रचारात खुद्द पंतप्रधानांनी मुस्लिमांना दहशतवादी आणि जास्त मुले जन्माला घालणारे अशा शिव्या घातल्या. काँग्रेस तुमचे मंगळसूत्र काढून घेऊन मुस्लिमांना देणार आहे असे मोदी म्हणत होते. शिवाय, आता आम्हाला मुस्लिमांच्या मतांची गरज नाही असे भाजपचे नेते सांगत असतात. तर मग आता त्यांनी एकगठ्ठा काँग्रेसला मतदान केले म्हणून रडणे ढोंगीपणाचे आहे. पण दलित व मुस्लिमांनी एकगठ्ठा मतदान केले म्हणून आपण हरलो हे बाकीच्या हिंदूंच्या मनावर ते बिंबवू पाहतात. पूर्वापार तथाकथित वरच्या जातीच नव्हे तर ओबीसी जातींमध्येही दलितांबाबत आकस वा द्वेष असल्याचे दिसून आले आहे. आपल्या मराठवाड्यासह देशाच्या अनेक भागांमध्ये दलितांवर अत्याचार करण्यात ओबीसी जाती पुढे असल्याचे अनेक अहवालात म्हटले आहे. या स्थितीत दलित व मुस्लिम एकत्र झाले तसेच तुम्हीही व्हा असा संदेश भाजपला या तथाकथित वरच्या जातींना द्यायचा आहे. त्यासाठीच एक है तो सेफ है असा नारा मोदींनी महाराष्ट्रातील सभांमध्ये दिला. थोडक्यात दलित व मुस्लिमांमुळे आपण धोक्यात आहोत, सबब भाजपला मतदान करा असा त्यातला गर्भितार्थ आहे. देवेंद्र फडणवीस यालाच थेट नॅरेटिव्ह म्हणत आहेत. पण खरे तर हे फेक नॅरेटिव्ह आहे. कारण, २०१९ पर्यंत व नंतरही देशातील बहुसंख्य मागास व आदिवासींसाठी राखीव जागांवर आपणच कसे निवडून येत आहोत अशी टिमकी भाजपवाले वाजवत होते. तेव्हा जो दलित समाज सूज्ञ होता तो एकाएकी इतका भोळाभाबडा झाला की काँग्रेसच्या खोट्या प्रचाराला बळी पडू लागला असे भाजपचे म्हणणे आहे. ते अर्थातच अत्यंत हास्यास्पद आहे.

## शिंदे यांचा कृतघ्नपणा

निवडणुकीसाठी सर्वच पक्ष काही ना काही नॅरेटिव्ह घेऊन येतात. पण भाजप आणि महायुतीचा सर्व प्रचारच खोट्या नॅरेटिव्हवर उभारलेला आहे. कोरोना काळात उद्धव ठाकरे यांच्या सरकारने उत्तम कामगिरी केल्याचे सर्वोच्च न्यायालयापासून ते जागतिक आरोग्य संघटनांपर्यंत अनेकांनी म्हटले. पण आता त्याच सरकारमध्ये काम केलेले एकनाथ शिंदे अत्यंत कृतघ्नपणे ठाकरे यांच्यावर टीका करतात. तेव्हा जनतेत भयंकर भीती होती व त्यामुळे गर्दीचे प्रसंग टाळण्यावर सर्वच सरकारांचा भर होता. तेव्हा मंदिरे उघडा, सण साजरे करूद्या असे म्हणून भाजपचे आंदोलन करणे नतद्रष्टपणाचे होते. आता त्यांच्या नादाला लागून शिंदे हेही त्याबाबत ठाकरे सरकारला दोष देतात. हे सर्व खोटे नॅरेटिव्ह पसरवण्याचे उद्योग आहेत. बाळासाहेबांच्या हिंदुत्वासाठी आपण भाजपसोबत गेलो असे एकनाथ शिंदे आता सांगतात. याच शिंद्यांनी २०२९च्या निवडणुकीपूर्वी भाजपचा निषेध करून जाहीर राजीनामा दिला होता. नंतरही त्यांनी पक्षामध्ये कधी भाजपसोबत जाण्याची भूमिका मांडलेली नव्हती. खरे तर, आपली भूमिका सच्ची आहे अशी शिंदे यांची खात्री होती तर त्यासाठी सुरत आणि गुवाहाटीत पळून जायची गरज नव्हती. येथेच राहून बंड करायला हवे होते. नारायण राणे, राज ठाकरे इत्यादींवर अनेक आक्षेप घेता येतील. पण त्यांनी निदान बाळासाहेबांना थेट आव्हान दिले होते. छुप्या रीतीने वार केले नव्हते. शिंदे यांचे बंड हे भाजपने प्रायोजित केलेले कारस्थान होते. कोश्यारींसारखे राज्यपाल, निवडणूक आयोग, न्यायालये यांच्या मदतीने ते पार पाडण्यात आले. लोकसभेला लोकांनी त्याविरुध्द चीड व्यक्त केल्याने यांची पाचावर धारण बसली आहे. त्यामुळेच इंडिया आघाडीचे फेक नॅरेटिव्ह वगैरे आरोप चालू आहेत. हरियाणामध्ये जाटांविरुध्द इतर जातींची एकजूट घडवण्याला भाजपचे सूक्ष्म नियोजन म्हणून गौरवायचे आणि इथे मात्र एक है तो सेफ है अशा घोषणा द्यायच्या असा हा सगळा ढोंगी कारभार आहे. यांनी कितीही प्रयत्न केले तरी मराठा, दलित, मुस्लिम आणि अनेक दुखावलेल्या ओबीसी जाती यांच्याकडे परत वळणे शक्य नाही.

विचार

# चार्टर विमानं का आणि कुणासाठी?

*आपल्याकडे केवळ आठ मान्यवर भारतीय उद्योगपतींकडे लांब पल्ल्याची खासगी जेट विमाने आहेत. शाहरुख खान, अमिताभ बच्चन आणि सलमान खानसारखे कलाकार आणि कपिलदेव, सचिन तेंडुलकर, धोनी, कोहली, हार्दिक पंड्या या क्रिकेटवीरांकडेही स्वतःची विमाने आहेत. आता मात्र अशा सेलिब्रिटींची आणि उद्योगपतींची मक्तेदारी असलेली खाजगी विमाने भाड्याने का होईना, इतरांच्या टप्प्यात आली आहेत.*

अतीश्रीमंत लोकांकडे स्वतःचे खाजगी विमान असते हे आपण ऐकलेले असते. कुणी हौशी विवाहेच्छू जोडप्याने आयुष्यभर लक्षात राहील म्हणून विमानात लग्न केले, अशा नवलाईच्या बातम्याही आपण वाचलेल्या असतात. नेहमीच इकॉनॉमी क्लासने लहान आणि अरुंद सीटवर बसून प्रवास करणाऱ्या लोकांच्याही मनात कुठे तरी स्वतंत्रपणे विमानातून रुबाबात प्रवास करायची इच्छा असते. पण डोळे मिटून अशी स्वप्ने पाहणाऱ्यांनो, लक्षात ठेवा, तुम्ही तुमचे स्वप्न पुरे करू शकता. तुम्ही खाजगी विमाने भाड्याने घेऊन वापरू शकता! तुमचे कुटुंब आणि तुम्ही अशा विमान प्रवासाचा आनंद घेऊ शकता. अशा गोष्टी आता खरोखरीच आपल्या हाताशी आल्या आहेत. कधी गरज म्हणून तर कधी हौस म्हणून भाड्याने चार्टर विमान घेणाऱ्या लोकांची संख्या गेल्या काही वर्षांमध्ये लक्षणीयरीत्या वाढली आहे. एका सर्व्हेनुसार कोरोनाच्या महामारीनंतर अशा खाजगी विमानांच्या भाड्यात ४० टक्के वाढ झालेली असूनही चार्टर विमाने बुक करणाऱ्या लोकांच्या संख्येत २० ते ३० टक्क्यांनी वाढ झाली आहे. तज्ज्ञांच्या मते येत्या तीन वर्षांमध्ये या दरांमध्ये सुमारे चाळीस टक्के वाढीचा अंदाज आहे.

मुळात चार्टर विमानांचा उपयोग भारतासारख्या देशात कसा आणि किती होतो ही समजून घेण्यासारखी बाब आहे. विमान भाड्याने घेण्याची अनेक कारणे असू शकतात. सर्वसामान्य कारणांपैकी एक म्हणजे तुम्हाला गंतव्यस्थानी तातडीने पोहोचणे आवश्यक आहे. कदाचित लांब पल्ल्याचा प्रवास हा करिअरचा एक भाग असेल आणि विमानतळावरील प्रचंड ताण टाळण्याची आवश्यकता असेल तर व्यावसायिकांना स्वतःसाठी विमान भाड्याने घेता येणे शक्य आहे. पायलटचा परवाना मिळवायचा असेल तर वैमानिकांना ठराविक तास हवेत लॉग करावे लागतात. त्यासाठी विमान भाड्याने घेणे हा एक चांगला मार्ग ठरतो. परवानाधारक वैमानिकांकडे स्वतःचे विमान नसेल, तर उड्डाणाच्या आनंदासाठी विमान भाड्याने घेता येते. उत्पन्नाचा एक भाग म्हणून इतरांसाठी फ्लाइंग सेवा करण्यासाठीही व्यवसाय म्हणून विमान भाड्याने घेता येते. सिनेमाच्या शूटिंगसाठी विविध प्रकारच्या विमानांची गरज असते, त्यांना या सेवेचा उपयोग होतो. राजकीय व्यक्तींना तातडीच्या कामासाठी प्रवास करण्यासाठी ही सेवा वापरली जाते. निवडणुकीच्या धामधुमीच्या काळात अशा चार्टर विमानांची मागणी फार मोठ्या प्रमाणात वाढते. गुप्ततेची गरज असलेली मोठमोठी व्यावसायिक डील्स अनेकदा अशा खाजगी विमानात होतात.

**अजय तिवारी**

व्यावसायिक विमान कंपनीतून उड्डाण करण्यापेक्षा खासगी जेट बुक करणे अधिक महागडे आहे, असा अनेकदा विचार केला जातो. तथापि, अशी काही उदाहरणे आहेत, जिथे खाजगी चार्टरद्वारे प्रवास करणे अधिक किफायतशीर आणि फायदेशीर असू शकते. विशेषतःआरोग्यसेवेसाठी याचा उपयोग अत्यावश्यक ठरतो. पेशंटला सुरक्षित आणि तातडीने हलवण्यासाठी चार्टर विमानसेवेचा उपयोग करणे आवश्यक ठरते किंवा देशातल्या एका शहरातील हॉस्पिटलमधून दुसऱ्या शहरातील हॉस्पिटलमध्ये हृदय-किडनी यांच्यासारखे अवयव प्लांट करायचे असतील तर तातडीने पाठवावे लागतात. त्यासाठी वेळेची मर्यादा असते. अशा वेळी या चार्टर विमानसेवेसारखा दुसरा पर्याय आज तरी उपलब्ध नाही.

कनिका टेकरीवाल 'जेट सेट गो' या भारतातल्या पहिल्यावहिल्या भाड्याने विमाने देणाऱ्या कंपनीच्या सहसंस्थापक आणि सीईओ आहेत. 'जेट सेट गो' ही कंपनी सुरुवातीला विमाने असणाऱ्यांकरिता विमान चालवणे, विमानाची देखभाल तसेच ठराविक करारानुसार विमाने भाडेतत्वावर देणे या सेवा पुरवत असे. कंपनीचा विस्तार होत गेला, तसे ते हेलिकॉप्टरसुद्धा भाड्याने पुरवू लागले. सध्या कनिका यांच्याकडे स्वतःच्या मालकीची दहा विमाने आहेत. त्यांची कंपनी क्लाउड आधारित शेड्युलिंग, एअरक्राफ्ट मॅनेजमेंट-सेवा आणि विमान, हेलिकॉप्टरच्या पार्ट्सची सर्व्हिस या सेवा देते. कंपनीच्या वेबसाइटद्वारे खासगी प्रवासी विमान, हेलिकॉप्टर आणि एअर ॲम्ब्युलन्स बुक करू शकतात. बिझनेस ट्रिपपासून वाढदिवसाच्या पार्टीपर्यंत अनेक कार्यक्रमांसाठी जेट किंवा हेलिकॉप्टरची सुविधा पुरवतात.

भाड्याने विमाने पुरवण्याच्या या सेवेत अजूनही काही कंपन्या काम करतात. ताज एअर, ब्ल्युहाइट एविएशन, एयर चार्टर सर्विसेस इन इंडिया, एलएफएस,आर्यन एव्हिएशन, पूनावाला एव्हिएशन या कंपन्या खाजगी विमानसेवेच्या व्यवसायात कार्यरत आहेत. त्यांच्याकडून विविध प्रकारची विमाने भाड्याने दिली जातात. साधारणतः पाच ते नऊ प्रवासी बसू शकतील, अशी तीन ते चार प्रकारची टर्बोप्रोप विमाने साधारणपणे दीड ते दोन लाख रुपये प्रती तास भाड्याने दिली जातात. चार ते सहा प्रवासी वाहून नेण्याची क्षमता असलेली हलक्या वजनाची जेट विमाने २.५ ते ३.५ लाख रुपये प्रती तास या दराने भाड्याने दिली जातात. मध्यम आकाराच्या सहा ते दहा लोक बसू शकतात अशा विमानांचे भाडे २.५ ते ४ लाख प्रतीतास असते, तर १२ प्रवासी बसू शकतील अशा सुपर-मिड आकाराच्या विमानांसाठी ३.५ ते दहा लाख रुपयांचे भाडे घेतले जाते. त्यापेक्षाही अधिक मोठ्या विमानांचे भाडे वेळ आणि प्रवाशांची संख्या यावर अवलंबून असते. ही विमाने अत्यंत आरामदायक आणि आकर्षक असतात. प्रवाशांच्या आवडीप्रमाणे आणि सूचनेप्रमाणे विमान कंपनी त्यात विविध प्रकारचे अन्नपदार्थ पुरवते. या विमानांमध्ये आवर्जून क्लायंटच्या आवडीच्या सिनेमा-नाटकांची सोय केली जाते. मेडिकल एयरक्राफ्टमध्ये व्हेंटिलेटर,ऑक्सिजन सिलेंडर आणि इतर आवश्यक सुविधा पुरवल्या जातात. अशा फ्लाइट्सच्या क्रू मेंबर्समध्ये मेडिकल क्षेत्रातील लोकांची व्यवस्था केली जाते. सगळ्यात महत्वाची बाब म्हणजे या विमानातून कोण प्रवास करत आहे ही बाब अत्यंत गुप्त ठेवली जाते. विमानतळावर ठराविक जागा भाड्याने घेणारे फिक्स्ड बेस ऑपरेटर येथून विमान भाड्याने देण्याची तसेच इतर सेवा देतात. फारशी व्यावसायिक हवाई वाहतूक नसलेल्या लहान एअरफील्डवर बहुतेकदा या ऑपरेटर्सची सेवा उपलब्ध असते. तिथून अशा भाड्याच्या विमानांची सेवा पुरवली जाते.

प्रायव्हेट जेटचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे पूर्ण प्रायव्हसी मिळते. त्यातून केवळ तुम्ही आणि तुमचा ग्रुप किंवा कुटुंब मिळून प्रवास करत असता. यासाठी तुम्हाला रांगेत उभे रहावे लागत नाही किंवा चेक इन बॅगेज मर्यादेचा त्रास होत नाही. अनेक विमानतळांवर खासगी उड्डाणांचे टर्मिनल वेगळे असतात. त्यामुळे या प्रवासात तुम्ही पाळीव प्राण्यांनाही सोबत घेऊन जाऊ शकता. शॅम्पू, कंडिशनर, लोशन, कोलोन, परफ्यूम, पाण्याच्या बाटल्या, औषधे, आवडती पेये आणण्याची अनुमती अशा प्रकारच्या चार्टर प्लेनमध्ये असते. भाड्याने दिलेली सर्व खाजगी विमाने पेये आणि स्नॅक्स पुरवत असताना, प्रवाशांच्या आवडीच्या कोणत्याही अतिरिक्त केटरिंगची व्यवस्था मागणीप्रमाणे केली जाते. प्रायव्हेट जेटने कुठेही प्रवास करता येतो. एकाच दिवसात अनेक ठिकाणी प्रवास करणेदेखील शक्य होते. महत्वाची बाब म्हणजे अशा फ्लाइटची येण्या-जाण्याची वेळ प्रवासी स्वतः ठरवू शकतो. त्यासाठी केवळ विमानतळ प्रशासनाची परवानगी घ्यावी लागते. एरवी प्रवास करताना आपल्याला उड्डाणाच्या किमान दोन, तीन तास आधी विमानतळावर पोहोचावे लागते. परंतु चार्टर्ड विमानाने प्रवास केला जातो, तेव्हा इतक्या लवकर विमानतळावर पोहोचावे लागत नाही. बहुतेक सर्व चार्टर्ड प्लेन्समध्ये वायफायची तसेच करमणुकीच्या सुविधादेखील मिळतात. हल्ली अनेक चार्टर्ड प्लेन्समध्ये ओटीटी प्लॅटफॉर्म्सचाही ॲक्सेस दिला जातो. विमान भाड्याने घेणाऱ्या क्लायंटच्या मागणीप्रमाणे या विमानांमध्ये विशेष केअरटेकरदेखील असतात. चार्टर प्लेन बुकिंगसाठी त्या त्या कंपन्यांच्या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन बुकिंग करता येते. आज भारत ही जगातील तिसरी सर्वात मोठी नागरी विमान वाहतूक बाजारपेठ आहे. देशात आणि परदेशात जाण्यासाठी देशातल्या असंख्य विमानतळांवरून अगणित उड्डाणे होत असतात. पदरी पैसे असलेल्या परंतु स्वतःचे विमान खरेदी करणे शक्य नसलेल्यांना मात्र अधूनमधून खाजगी विमानाची गरज असणाऱ्यांना या सुविधेमुळे विमानप्रवास करणे सोपे, सोयीचे आणि आरामदायक झाले आहे. चार्टर विमानांची आणि प्रवाशांची संख्या वाढत जाईल तशी नजीकच्या भविष्यकाळात चार्टर विमानांमधून प्रवास करणे ही बाब केवळ श्रीमंताची मक्तेदारी न राहता सामान्य माणसांच्या आवाक्यात येऊ शकेल आणि त्यावेळी भारत जगातल्या पहिल्या तीन आर्थिक महाशक्तींमधला एक देश असेल.

आजकाल

# मराठी चित्रपट लाडके कधी होणार?

काही वर्षांपूर्वी जेव्हा संदीप सावंतचा 'नदी वाहते' आला. तेव्हा त्याच्या पहिल्या दिवशी जाहिरात येण्याची काही अडचण झाली होती. त्याबरोबर स्क्रॅबल कंपनीच्या हलगर्जी पणामुळे एन्कोडींगचे काही घोळ झाल्याने पहिल्या दिवशी शोजच कॅन्सल झाले होते. तांत्रिक चुका होणारच नाहीत असं सांगता येत नाही. पण कधी सलमान खानच्या फिल्मच्या रिलीजला त्या झाल्याचं ऐकीवात नाही. मराठी सिनेमाला मात्र तेच तंत्रज्ञान वापरुनही जरा जास्तच चुका होतात.




नीरजा पटवर्धन च्या पोस्टनुसार, आताही काही मल्टीप्लेक्सेस तांत्रिक कारणं देऊन 'ह्या गोष्टीला नावच नाही' चित्रपटाचा शो कॅन्सल करावा लागत असल्याचं सांगतायत. हे कसलं तांत्रिक कारण आहे जे एकदम अनेक थिएटर्समधे उपटतं? पहायला पुरेसे लोक असूनही मल्टीप्लेक्सेस शोज का लावत नाहीत. असं करणाऱ्या थिएटर्सची चौकशी का केली जात नाही? 'श्वास' सिनेमाचं नाव आपण रुटीनला मराठीला पुनरुज्जीवन देणारा सिनेमा असं करतो. त्या सिनेमाच्या दिग्दर्शकाला असे प्रश्न येणार असले, तर तुलनेने कमी माहित असलेले लोक रिलीजसाठी झगडणं स्वाभाविकच म्हणावं लागेल.

**गणेश मतकरी**

काही वर्षांपूर्वी मराठीला 'प्राईम टाईम' देतो अशी एक घोषणा सरकारने केली होती, आणि पुढे लगेचच काही चक्र फिरुन मराठी सिनेमा साठी दुपारपासून रात्रीपर्यंत सगळाच प्राईम टाईम अशी एक हूल दिली गेली. त्यानंतर फार काही झाल्याचं माहीत नाही. सध्या मराठी सिनेमा अडचणीत



आहे हे सर्वांना माहीत आहे. सिंगल स्क्रीन्स कमी होतायत, ओटीटी वाले मराठी सिनेमा फारसा स्वीकारत नाहीत, आणि मल्टीप्लेक्सेसचं एकूणच दुर्लक्ष करण्याचं धोरण आहे. या परिस्थितीत सरकार काही धोरणात्मक हालचाल का करु शकत नाही? मराठीला अमुक इतके खेळ मिळावेत, ते रद्द झाले तर का झाले याची चौकशी व्हावी, खेळ केवळ तांत्रिक कारण सांगून रद्द करुन त्या जागी लगेच इतर भाषिक सिनेमा दाखवला जाऊ नये, अशा काही सिस्टम्स वापरात का येऊ शकत नाहीत? केवळ अनुदान आणि पुरस्कार देणं हेच सरकारी काम आहे का ? जे खरे धडपडतायत त्यांना सिनेमा पोचवण्यासाठी मदत का होऊ शकत नाही? जी राज्याची (आणि आता अभिजात दर्जा मिळालेली) भाषा आहे, त्या भाषेतल्या साहित्य नाट्य चित्रपटाला भक्कम करण्यासाठी काही पावलं उचलली जाणार की नाही?

सरकारच्या लाडक्या लोकांच्या क्रमात बहीणी, युवा आणि शेतकऱ्यांच्या किती मागे कलावंतांचा नंबर लागणार आहे?

अखेर सिनेमा निव्वळ मदतीवर तरणार नाही. प्रेक्षकांनी सपोर्ट न दिल्याचे हे दूरगामी परिणाम आहेत आणि ते बदलायचे तर प्रतिसाद दिसायला हवा, हे मी अनेक वर्ष सांगतोय जे आताही खरं आहे. पण चित्र बदलेपर्यंत काही प्रमाणात मदत लागणार हे दिसतच आहे. जी अशा धोरणांच्या स्वरुपात झाली, तर त्याचा उपयोग अनुदानापेक्षा अधिक होऊ शकतो.

**साभार**

लोकसंसद

## एका वर्षात देशात २५ वाघ बेपत्ता, ९९ वाघांचा मृत्यू

अलिकडेच ऑगस्ट महिन्यात राजस्थान राज्यातील ढोलपूर-करौली येथे देशातील आणखी एक व्याघ्र प्रकल्प अस्तित्वात आल्यामुळे देशात वाघांच्या संरक्षण आणि संवर्धनासाठी एकूण ५५ व्याघ्र प्रकल्प कार्यान्वित झाले आहेत. या व्याघ्र प्रकल्पांनी वाघांच्या अधिवासासाठी विविध राज्यातील एकूण ७८ हजार ७३६ चौरस किलोमीटर जंगल जमीन व्यापली असून त्यामुळे देशात वाघांची संख्या काही प्रमाणात वाढली आहे. २००६ च्या व्याघ्रगणनेत देशात १ हजार ४११ वाघ होते तर २०१८ च्या व्याघ्रगणना सर्वेक्षणानुसार २ हजार ९६७ वाघांची नोंद करण्यात आली. आता २०२३ च्या व्याघ्रगणनेनुसार देशात ३ हजार ६८२ वाघ आहेत म्हणजेच २०१८ च्या तुलनेत गेल्या पाच वर्षांत वाघांच्या संख्येत २४ टक्क्यांनी वाढ झाली आहे. विशेष म्हणजे जगातील एकूण व्याघ्रसंख्येच्या ७५ टक्के वाघ भारतात आहेत. मात्र व्याघ्र संरक्षण आणि संवर्धनाच्या या आशादायी आणि आनंददायी वातावरणावर विरजण पडावे अशा दोन बातम्या समोर आल्या आहेत. पहिली बातमी म्हणजे राजस्थानच्या सवाई माधोपूर येथील रणथंबोर राष्ट्रीय उद्यानातून गेल्या एका वर्षात ७५ पैकी २५ वाघ बेपत्ता झाले आहेत आणि दुसरी बातमी म्हणजे या वर्षाच्या ऑक्टोबर महिन्यापर्यंत देशात ९९ वाघांचा मृत्यू झाला आहे. देशातील वाघांच्या बेपत्ता होण्याने आणि वाढत्या मृत्यूंमुळे वन्यजीवप्रेमींकडून चिंता व्यक्त केली जात आहे.

**- प्रदीप शंकर मोरे, अंधेरी**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**१२ नोव्हेंबर**

**१८८० :-** संघर्षशील कार्यकर्ते आणि तत्त्वचिंतक पांडुरंग महादेव तथा 'सेनापती बापट यांचा जन्म. मुळशी धरण सत्याग्रहासह अनेक लोकलढ्यांचे सेनापतित्व त्यांनी केले. तसेच संघर्षाचे तत्त्वचिंतन करणारे 'चैतन्यगाथा' हे पुस्तक लिहिले. योगी अरविंद घोष यांच्या 'दिव्यजीवन' या पुस्तकाचा अनुवाद त्यांनी केला. निधनानंतर १० वर्षांनी, १९७७ साली त्यांच्या समग्र साहित्याचा ग्रंथ राज्य सरकारने प्रकाशित केला. **१९०४ : -** ज्येष्ठ समाजवादी कार्यकर्ते श्रीधर महादेव जोशी म्हणजेच 'एस् एम' किंवा 'एसेम' जोशी यांचा जन्म. संयुक्त महाराष्ट्र, गोवामुक्ती आदी चळवळीतील सक्रिय सहभागानंतर त्यांनी वृत्तपत्रांतून लेखन केले. 'मी एसेम' हे त्यांचे पुस्तक, मराठीतले एक महत्त्वाचे आत्मचरित्र ठरले. याशिवाय एस् एम् यांनी 'आपल्या मुलांना शिबिरात पाठवा', 'नेताजींचे सीमोल्लंघन', 'बालपणाच्या गोष्टी', 'सतलजची हाक ब्रम्हपुत्रेची तहान' तसेच 'उर्मी' हा लेखसंग्रह आणि संयुक्त महाराष्ट्र वादी युवकांना आवाहन अशी साहित्यसंपदा. **१९२४ :-** लेखक, रत्नांचे व्यापारी एम. यू. मोतीवाला यांचा जन्म. 'रत्नरहस्य' हा त्यांचा ग्रंथ प्रसिध्द. **१९२५ :-** मराठी साहित्याचे दालन क्रिकेटच्या दालनाने सजवणारे लेखक रविंद्र पाटकर यांचा जन्म. 'क्रिकेट कथा नि किस्से' हे त्यांचे पहिले पुस्तक. त्यानंतर 'क्रिकेट आणि क्रिकेट', 'क्रिकेटमहर्षी प्रो. दि. ब. देवघर', 'क्रिकेटचा ज्ञानकोश', 'सचिन', देशोदर्शींची क्रिकेट मैदाने', 'सचिनचे १०१ किस्से' आणि आत्मानुभवावर आधारित 'खेळ मांडियेला' हे पुस्तक अशी साहित्य संपदा. **१९३२ :-** लेखक मारुती चितमपल्ली यांचा जन्म. **१९३६ :-** लेखिका, बालसाहित्यिका व आकाशवाणीवरील अधिकृत कवयित्री विजया श्रीनिवास जहागिरदार यांचा जन्म. ह्यांची 'अस्सं झालं गडया', 'टिम टिम टिकली', 'सुगंध' ह्या बालकथा तसेच 'कल्पवृक्षाची फळे' हा गीतांजलीवरील निवडक कवितांचा अनुवाद, 'खडीसाखरेचे वेल', 'छुमछुम गाणी' ही बालगीते याशिवाय 'पाचूची दिपमाळ' ही बालकादंबरी. 'वास्तु', 'जुई' या दोन कादंबऱ्या. अशी साहित्य संपदा. **१९४४ :-** लेखक, समीक्षक राज्यशास्त्राचे अभ्यासक प्रा. रावसाहेब रानोजी कसबे यांचा जन्म. लेखकाचा डॉ. आंबेडकरांच्या साहित्याचा गाढा अभ्यास असून यावर 'आंबेडकरवाद' या पुस्तकातून 'आंबेडकरांचे तत्त्वज्ञान', 'आंबेडकर आणि मार्क्स' ह्या ग्रंथासह 'बंथ ऑफ थॉट' मधून गोळवळकर गुरुजीच्या ग्रंथाची समीक्षा. याशिवाय 'दलित चळवळीची वाटचाल', 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना' ही त्यांची अल्प ग्रंथसंपदा. **१९५२ : -** लेखक, विनोदी कथा-कादंबरीकार 'विदूषक' या दिवाळी अंकाचे संपादक, प्रकाशक, ग्रंथ वितरक अरुण नासिककर यांचा जन्म. ठपळता भुई चिक्कारम', 'स्पेशल हनिमून बस' या विनोदी कादंबऱ्यांसह 'ब्रुस ली झिंदाबाद' हा विनोदी कथासंग्रह प्रसिध्द. **१९५५ :-** लेखक राजेंद्र प्रभाकर देव यांचा जन्म. 'फुलवा' हे बालसाहित्य त्यांचे प्रकाशित झाले आहे. **१९५८ :-** लेखक वामन पुनेश्वर शेळमाके यांचा जन्म. ह्यांचा 'जागवा मने पेटवा मशाली' हा काव्यसंग्रह आणि 'महाबिरला' हे नाटक अशी साहित्य संपदा. **१९५९:-** सत्यशोधक पत्रकार व कार्यकर्ते केशवराव जेधे यांचे निधन. 'शिवस्मारक व कैवारी' ही साप्ताहिक, तर 'मजूर' हे वृत्तपत्र त्यांनी चालविले. गणेशोत्सवाच्या ब्राह्मीकरणाला शह देण्यासाठी त्यांनी काढलेल्या मेळ्यातील गीते आक्रमक शैलीतील होती. 'देशाचे दुश्मन' हे त्या तेली १००२१) नानगस्त सलेले तक त्यांनी लिहिले होते. **१९६० :-** साहित्यिक अमर रामटेके यांचा जन्म. 'कॉ. जोशी', 'शहर' या नाटकांसह 'अग्निशब्द' तसेच 'शहर पार्टी', विस्फोट', 'बगावत' ही पथनाट्ये, 'मुक्ता', 'धर्म', 'तिच्या हाती फाशीची दोरी', 'कफर्यू', 'हे जग बुद्धाचे' हे एकांकिका संग्रह, 'आधार' हे बालनाट्य, 'महासूर्य' ही टेलिफिल्म, अशी विपूल साहित्य संपदा त्यांच्या नावावर आढळते. **१९७० :-** कवी संगीत दिग्दर्शक प्रल्हाद मेश्राम यांचा जन्म. 'मोहतेल व झाडी' हा काव्यसंग्रह त्यांचा प्रकाशित झाला आहे. **१९९७ :-** वेदशास्त्रसंपन्न विनायक भट्ट घैसास गुरुजी यांचे निधन.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

१२ नोव्हेंबर

१) श्री.रमेश भास्कर नाईक
वरसोली, अलिबाग दि.१२/११/१९४२

२)श्रीम.स्मिता आरूण दांडेकर
गुरव नगर, अलिबाग दि.१२/११/१९४८

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

# माथेरानमध्ये स्पायरल पार्किंग हवे



**। माथेरान । प्रतिनिधी ।**
**वाढत्या पर्यटकांच्या संख्येमुळे नेहमीच गाड्यांना पार्किंग करण्यासाठी जागा अपुऱ्या पडत आहेत. दस्तुरी नाक्यावर वनखात्याच्या जागेत सर्वत्र जंगलांनी व्यापलेल्या या ठिकाणी जवळपास एक हजार गाड्यांची सोय होणे गरजेचे आहे. त्यासाठी येथील बोरीचे मैदानात स्पायरल पार्किंग विथ फॅब्रिकेशन वर्क्सच्या सहाय्याने व्यवस्था केल्याशिवाय अन्य कुठलाही पर्याय उपलब्ध नाही, असे स्थानिकांचे म्हणणे आहे.**

### स्थानिकांकडून होतेय मागणी

माथेरान रेल्वेच्या अवघ्या दोन फेऱ्यांमुळे होणाऱ्या प्रवासाला त्रासून सर्वच पर्यटक नाईलाजाने स्वतःच्या मोटार गाड्या अथवा खासगी वाहनांच्या सहाय्याने माथेरान गाठण्यासाठी धावपळ करीत असतात. परंतु, वाहनतळ असलेल्या तसेच माथेरानकरांच्या व्यावसायिक दृष्टीने माथेरानचा उंबरठा समजल्या जाणाऱ्या दस्तुरी या ठिकाणी आल्यावर सुट्ट्यांच्या हंगामात इथल्या अपुऱ्या जागेमुळे बाहेर पडताना पर्यटकांची त्रेधातिरपीट उडते. अनेकदा घोडेवाले, हमाल, रूम एजंट यांच्या गऱ्हाड्यातून निसटणे म्हणजे त्यांना एकप्रकारे अग्निदिव्य पार करून बाहेर यावे लागत असते.

चार वर्षांपूर्वी एमएमआरडीए च्या माध्यमातून याच पार्किंग साठी जवळपास पाच कोटी रुपयांचा निधी खर्च करण्यात आला होता त्याचा विनियोग चुकीच्या पद्धतीने केल्यामुळेच अशी अवस्था निर्माण झाली आहे. याच पैशांत सुसज्ज स्पायरल पार्किंग झाली असती परंतु तत्कालीन लोकप्रतिनिधींनी भविष्याचा विचार न केल्यामुळे आज पार्किंगची दयनीय अवस्था आहे. सध्या जरी दस्तुरी येथील अपुऱ्या पार्किंगच्या गैरसोयीमुळे जुमापट्टी येथे गाड्यांना आश्रय दिला गेला. तरी आगामी काळात याची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी ठोस उपाययोजना राबविण्यात याच भागातील बोरीचे मैदान येथे नाविन्यपूर्ण अशी जवळपास १००० गाड्यांची जादा पार्किंगची सोय होणेकामी स्पायरल पार्किंग सोबतच फॅब्रिकेशन वर्क्स अशाप्रकारे पार्किंगची अद्ययावत सुविधा लवकरात लवकर उपलब्ध व्हावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

> माथेरानला पर्यटन हंगामात १००० गाड्या पार्क होतील अशी व्यवस्था होणे गरजेचे आहे. त्यासाठी शासनाने एमपी ९३ हा प्लॉट नगरपरिषदेकडे वर्ग करणे आवश्यक आहे. जेणेकरून त्याजागी तीन मजली स्पायरल पार्किंगची व्यवस्था करता येईल, सद्यस्थितीत येणाऱ्या सर्व गाड्यांची पार्किंग वनविभागाच्या जागेवर केवळ जागेचे भाडे घेऊनन केली जाते. यामुळे माथेरान च्या उत्तम पर्यटनासाठी अद्ययावत पार्किंगची नितांत आवश्यकता आहे.
> - योगेश जाधव, अध्यक्ष, वन व्यवस्थापन समिती माथेरान

> सातत्याने पर्यटन हंगामात होणारी वाहतूक समस्या यामुळे अनेक पर्यटकांना आपली वाहने घेऊन माथेरानला येता येत नाही. ती अर्ध्या घाटात किंवा जुमापट्टी येथे उभी करून पुढील वेळखाऊ प्रवास करावा लागतो. याकरिता वनविभागाने आपल्या अखत्यारीत असणाऱ्या माऊंटबेरी येथे रस्ता करून पार्किंगची व्यवस्था केल्यास फार मोठ्या प्रमाणात समस्या मार्गी लागेल.
> - शिवाजी शिंदे माजी विरोधी पक्षनेते, माथेरान

# पेट्रोल पंपाच्या बिलाच्या रकमेत अपहार

**। पनवेल । वार्ताहर ।**

पेट्रोल पंपावर मॅनेजर आणि कॅशियर म्हणून काम करणाऱ्या राहुल कुमार संतु यादव याने ३ लाख ६६ हजार १३२ रुपये पेट्रोल पंपाच्या मालकाला न देता त्या रकमेचा अपहार केल्याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

वेलकम हॉटेलच्या बाजूला पळस्पे येथे एजी जाजल पेट्रोल पंप आहे. २०१२ पासून राहुल कुमार यादव हा डिझेल भरण्याचे काम करत होता. २०१९ पासून त्याला असिस्टंट मॅनेजर व कॅशियर म्हणून कामासाठी ठेवले. ऑगस्ट महिन्यात पंकज कुमार पांडे- मॅनेजर हे गावी गेले. यावेळी त्यांचा कारभार राहुल कुमार यांच्याकडे सोपवला. ते पुन्हा कामावर रुजू झाले. यावेळी त्यांचे खातेधारक ग्राहक यांच्याकडे डिझेलच्या बिलाचे पैसे मागितले असता राहुल यादव यांच्याकडे रोख रक्कम दिल्याचे सांगितले. यावेळी त्याच्याकडे विचारणा केली असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यानंतर दुसऱ्या खातेधारकाला बिलाची मागणी केली असता त्याने राहुल कुमार यादव याला पैसे दिल्याचे सांगितले. अशाप्रकारे एकूण तीन लाख ६६ हजार १३२ रुपये रोख रकमेबाबत राहुलकडे विचारणा केली असता त्याने रक्कम स्वीकारल्याचे कबूल केले. आणि पैसे मुलाच्या दवाखान्यासाठी खर्च केल्याचे सांगितले.

त्यानंतर त्याने पैसे परत देतो असे सांगितले. मात्र पैसे परत दिले नाहीत. त्याला फोन केला असता फोन बंद आला. या प्रकरणी राहुल कुमार संतु यादव (राहणार नांदगाव पनवेल, मुळगाव उत्तर प्रदेश याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

## अश्लील हावभावप्रकरणी तृतीय पंथीयाविरोधात गुन्हा

**। पनवेल । वार्ताहर ।**

सार्वजनिक ठिकाणी अश्लील हावभाव करून बीभत्स वर्तन केल्याप्रकरणी तृतीय पंथीविरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

स्टील मार्केट रोडवर, मारुती चेंबर येथे एक तृतीयपंथी इसम अश्लील हावभाव करून नागरिकांचे लक्ष वेधून घेत होता. त्यावेळी पोलिसांनी या तृतीयपंथीयास ताब्यात घेतले. त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला.

# फणसडोंगरी ग्रामस्थ उत्तर भारतीय कुटुंबाच्या वादाने त्रस्त

**। पेण । प्रतिनिधी ।**

पेण फणसडोंगरी गोळीबार मैदान येथे विश्वकर्मा कुटुंबिय आणि प्रसाद कुटुंबिय यांचा गेली दोन ते तीन वर्ष कौटुंबिक वादाने फणसडोंगरीवासिये त्रस्त झाले आहेत. हे दोन्ही कुटुंबिय उत्तर भारतीय असून जागेच्या वादातून सतत भांडण होत असून, शांतता व सुव्यवस्थेचे या दोन्ही कुटुंबियांनी तीनतेरा वाजवले आहेत. दर महिना ते पंधरा दिवसात या कुटुंबियांचा वाद पोलीसठाण्यापर्यत जात आहे.

महत्त्वाचीबाबम्हणजे, विश्वकर्मा कुटुंबियांच्या घरात मुली आहेत तर प्रसाद यांच्या कुटुंबात मुले आहेत. त्यामुळे परस्परांच्यावर चुकीच्या पध्दतीने गुन्हे नोंदवून पोलीस यंत्रणेला त्रस्त केले जात आहे. सदर दोन्ही कुटुंबियांना पोलीसांकडून वेळोवेळी योग्य ती कारवाई होउन सुध्दा दोन्ही कुटुंब परस्परांविरूध्द कुरघोडी करण्यास कमी पडत नाहीत. अखेर फणसडोंगरी ग्रामस्थ जिल्हा पोलिस अधिक्षकांना भेटून या दोन्ही कुटुंबियांवर तडीपारची कारवाई करावी अशी मागणी करणार आहेत. महत्त्वाची बाब म्हणजे ज्या जमिनी वरून वाद सुरू आहे ती जमिन पेण नगरपालिका हद्दितील सरकारी जमिन आहे. ती कुणाच्याही मालकीची जमिन नाही. असे असतानादेखील चुकीच्या पध्दतीने कागदपत्र करून या जमिनी परस्परांच्या नावावर केल्याचे समजते. दोन दिवसांपूर्वी फिर्यादी रेखा गोविंद प्रसाद हिने नर्मदा कुंजबिहारी विश्वकर्मा, दुर्गा विश्वकर्मा, साक्षी विश्वकर्मा, कुंजबिहारी विश्वकर्मा, गोविंद विश्वकर्मा, वंदना विश्वकर्मा यांच्या विरूध्द फिर्याद नोंदविली असून, तिच्या फिर्यादीनुसार गुन्हा नोंद केला आहे. समाज माध्यमांवर फिरणाऱ्या व्हिडीओमध्ये विश्वकर्मा कुटुंबियांकडून प्रसाद कुटुंबियांवर हल्ला चढविल्याचा दिसून येत आहे. असे असले तरी दुर्गा कुंजबिहारी विश्वकर्मा हिने गोविंद प्रसाद, रेखा प्रसाद, हेवंती प्रसाद, चंदन प्रसाद यांच्याविरूध्ददेखील पेण पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

## कार चालकाला तिघांनी लुटले

**पनवेल :** कार चालकाला चाकूचा धाक दाखवून आणि मारहाण करून खिशातील ९ हजार रुपये आणि दोन मोबाईल जबरदस्तीने काढून केल्याप्रकरणी तीन अनोळखी इसमाविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. शहबाज खान हा पलावा सिटी डोंबिवली येथे असताना त्याला पनवेल येथील भाडे आले. त्याच्या स्विफ्ट डिझायर कारमध्ये तिघेजण बसले. मुंब्रा पनवेल रोडने जात असताना धानसर टोलनका ओलांडून रोहिंजन गाव गजेबो ढाब्याचा पुढे आला असता पाठीमागे बसलेल्या एका इसमाने शहाबाजने लावलेल्या सीट बेल्टने त्याचा गळा आवळला आणि गाडी बाजूला घेण्यास सांगितली. त्याने घाबरून गाडी बाजूला घेतली.

# चिरनेरमध्ये बासमती भाताचे विक्रमी उत्पादन



**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील चिरनेर येथील एका शेतकऱ्याने बासमती भातपिकाचे विक्रमी उत्पादन घेतले आहे. एक एकराच्या क्षेत्रावर लागवड करण्यात आलेल्या भात शेतात त्यांनी तब्बल दोन खंडी दोन मण एवढ्या उत्पादनाचे भातपीक पिकविले आहे. संतोष बाळकृष्ण चिर्लेकर असे या शेतकऱ्याचे नाव असून, हा शेतकरी भातलागवडीबरोबर मळ्याचीही शेती करत आहे.

दरवर्षी ते आपल्या शेतात नवनवीन प्रयोग करत असून, यावर्षी त्यांनी बासमती हे भात पीक घेऊन उत्पादनात दुपटीपेक्षा अधिक वाढ केली आहे. दरवर्षी एका एकरात १५ ते १६ मण भात पिकविणाऱ्या या शेतकऱ्याने यावर्षी बासमती भाताचे तब्बल बेचाळीस मण भातपीक पिकविले आहे. योग्यवेळी नांगरणी, चिखलणी, भात रोपांची लागवड व औषध फवारणी तसेच योग्य प्रमाणात खताची मात्रा करून त्यांनी हे विक्रमी पीक घेतले आहे.

दरवर्षीप्रमाणे त्यांनी भात बियाणे केंद्रातून हे बासमतीचे भात बियाणे खरेदी केले. या पिकाची यशस्वी लागवड करून, त्यांनी या भात पिकाचे विक्रमी उत्पादन घेतले आहे. दरवर्षी भात बियाणे बदलून शेतकऱ्यांनी भात लागवड करायला पाहिजे. त्यामुळे उत्पादनात नक्कीच वाढ होईल, असे ते म्हणाले. याआधी भात शेतीमध्ये आम्हाला या एका एकराच्या जागेत १५ ते १६ मण भात पिकत असे. मात्र, अलीकडे दरवर्षी आम्ही संकरित बियाण्यांचा वापर करत असल्यामुळे भात पिकांच्या उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. तालुक्यातील कृषी अधिकाऱ्यांचा आम्ही सल्ला घेतो. त्यांनी सांगितलेल्या भात बियाणांचा तसेच औषधांचा आम्ही भातशेतीसाठी आणि मळ्याच्या शेतीसाठी वापर करतो, असेही त्यांनी सांगितले.

**पान १ वरून**

## धरण कागदावर, निधी खात्यावर

यामध्ये खरीप ५२.०९ हेक्टर, वरकस ३९.४६ हेक्टर, पोट खराब १२.२६ हेक्टर जमिनींचा समावेश आहे. प्रकल्पामुळे जांभुळवाडी, खैरवाडी, सांबरकुंडवाडी या तीन वाड्यांवरील २०८ कुटुंबांचे पुनर्वसनही करावे लागणार आहे. यामध्ये विस्थापित होणाऱ्या कुटुंबांमध्ये सार्वधिक घरे आदिवासी बांधवांची आहेत. पुनर्वसन होणार असल्याने येथील आदिवासी बांधवांनी रामराज हद्दीमध्येच पुनर्वसन करावे, अशी मागणी जिल्हा प्रशासनाकडे केली होती. त्यानुसार जिल्हा प्रशासनाने पुनर्वसनासाठी खासगी जागेचे संपादन केले आहे.

अलिबाग तालुक्यातील रामराज भागात १९६२ पासून प्रस्तावित असलेले सांबरकुंड धरण आता सानुग्रह अनुदानाच्या कैचीत सापडले आहे. शासन शेतकऱ्यांना हेक्टरी ८० लाख रुपये सानुग्रह रक्कम देत आहे. शेतकऱ्यांनी पाच कोटी हेक्टरी देण्याची मागणी प्रशासनामार्फत शासनाकडे केली आहे. त्यामुळे सांबरकुंडाचा प्रश्न पुन्हा शासनाच्या कोर्टात शेतकऱ्यांनी पाठवला आहे. सांबरकुंड धरणासाठी २०१३ साली निवाडा झाला आहे. या निवाड्यानुसार शेतकऱ्यांना मिळालेला मोबदला हा खूपच अत्यल्प आहे. त्यामुळे नवीन भूसंपादन कायद्यानुसार वाढीव मोबदला द्या, अशी मागणी शेतकऱ्यांची आहे. वाढीव मोबदल्यासह धरणग्रस्त कुटुंबांना शासकीय नोकरी, महान आणि महानवाडी या दोन गावांचेदेखील पुनर्वसन करावे, अशा विविध मागण्या शेतकऱ्यांनी शासनाकडे केल्या आहेत.

२८ सप्टेंबर १९८२ साली जलसंपदा विभागाने धरण प्रकल्पाला मंजुरी दिली. त्यावेळी ११ कोटी ७१ लाखांत धरण होणार होते. मात्र, हा प्रकल्प कागदावरच राहिला. पुन्हा २०१२-१३ ला धरणचा मुद्दा उपस्थित झाला आणि ११ कोटींवरून ३३५.५२ कोटींवर खर्च गेला होता. आता या धरणाचा खर्च साडेसातशे कोटींवर गेला आहे. अजूनही धरणाचा प्रश्न हा लटकलेला असल्याने काही दिवसाने धरणाचा खर्च हजारो कोटींवर जाण्याची शक्यताही नाकारता येत नाही. असे सांबरकुंडाचे सरकार दरबारी कागदावरील चित्र असताना स्थानिक आमदार सांबरकुंड धरणाच्या डागडुजी आणि दुरुस्तीसाठी मी ९९ कोटी रुपयांचा निधी आणला आहे. यामुळे अलिबाग तालुका ओलिताखाली येईल, असे संभ्रमात टाकणारे विधान करीत असल्याने सांबरकुंड धरणग्रस्त संतप्त झाले आहेत.

## निवारा शेडचे काम कागदावरच

फटका दळवी यांना विधानसभा निवडणुकीत बसण्याची भीती दळवी समर्थकांमध्ये झाली. त्यामुळे ऐन विधानसभा निवडणुकीच्या हंगामातच गेल्या आठ दिवसांपूर्वी खडी, रेती, दगड टाकून ठेवले आहेत. गेल्या दोन वर्षांत दळवींच्या समर्थकांनी काम का केले नाही, असा संतप्त सवाल तेथील नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

निवारा शेडच्या कामाची मुदत संपून आठ महिने होत आले आहेत. तरीदेखील निवारा शेडचे काम न झाल्याने अनेक ग्रामस्थांनी कामाबाबत नाराजी व्यक्त केली आहे. आमदार दळवी यांच्याकडून विकासाच्या बाता मारल्या जात आहेत. मात्र, ही कामे त्यांच्या समर्थकांकडून वेळेत पूर्ण करण्यास दळवी अपयशी ठरल्याची चर्चा जोर धरत आहे. त्यामुळे या निवडणुकीत ग्रामस्थांच्या रोषाला दळवींना सामोरे जावे लागणार आहे. त्याचा फटका बसण्याची शक्यताही वर्तविली जात आहे.

## दिव्यांग, ज्येष्ठ बजावणार हक्क

चव्हाण यांनी सांगितले.

१९३-श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघामध्ये दि.१४ व दि.१५ नोव्हेंबर रोजी होणार दिव्यांग, ज्येष्ठांचे गृहमतदान होणार आहे. या मतदारसंघामध्ये माणगाव, तळा, रोहा, श्रीवर्धन व म्हसळा तालुक्यातील पोस्टल बॅलेटकरिता ८५+ मतदार ४७२ व दिव्यांग मतदार ११६ यांना मतदान करण्याकरिता पोस्टल बॅलेटसाठी १२ ड अर्ज दिले आहेत. त्यानुसार गुरुवार, दि.१४ व शुक्रवार, दि.१५ नोव्हेंबर रोजी दिव्यांग व ज्येष्ठांचे गृहमतदान होणार असून, त्यासाठी २८ पथके तयार करण्यात आली आहेत, अशी माहिती श्रीवर्धनचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी महेश पाटील यांनी दिली आहे.

१९०-उरण विधानसभा मतदारसंघामध्ये दि.१५ नोव्हेंबर रोजी होणार दिव्यांग, ज्येष्ठांचे गृहमतदान होणार आहे. या मतदारसंघामध्ये पोस्टल बॅलेटकरिता ८५ वर्षांवरील मतदार ६८ व दिव्यांग मतदार १६ यांना पोस्टल बॅलेटसाठी १२ ड अर्ज दिले आहेत. त्यानुसार ८५ वर्षांवरील ६८ व दिव्यांग १६ मतदार अशा एकूण ८४ मतदारांची गृहमतदानासाठी नोंदणी करण्यात आली आहे. याकरिता ७ पथके कार्यरत असणार आहेत, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी जनार्दन कासार दिली आहे.

१८९-कर्जत विधानसभा मतदार संघामध्ये दि.१५ व दि.१६ नोव्हेंबर रोजी होणार दिव्यांग, ज्येष्ठांचे गृहमतदान पार पडणार आहे. या मतदार संघामध्ये पोस्टल बॅलेटकरिता ८५+ मतदार १७३ व दिव्यांग १६ यांना मतदान करण्याकरिता पोस्टल बॅलेटसाठी १२ ड अर्ज दिले आहेत. मतदानासाठी ८ पथके कार्यरत असणार आहेत, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी कर्जत प्रकाश सकपाळ यांनी दिली आहे.

येत्या २० नोव्हेंबर रोजी होत असलेल्या विधानसभा निवडणूकीत मतदारांनी निर्भयपणे मतदानाचा हक्क बजवावा, मतदानासाठी नागरिकांमध्ये जागरुकता यावी, म्हणून मतदारसंघात विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. लोकशाहीच्या या उत्सवात मतदानाचे पवित्र कार्य पार पाडावे, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी केले आहे.

## जमिनीचे पैसे नको, प्रकल्पात भागिदारी द्या

ॲड. प्रसाद पाटील, अवधूत पाटील, ऋषिकेश माळी आदी पदाधिकारी उपस्थित होते.

निवडणूक वेगळ्या पद्धतीची आहे, मतदारसंघात महाविकास आघाडीसाठी पोषक वातावरण आहे, विकासकामे मंजूर करण्यासाठी आजपर्यंत अलिबागच्या आमदाराने टक्केवारी घेतली नाही; परंतु महायुतीच्या आमदाराने टक्केवारी घेण्याचा कळस गाठला आहे, विधानसभा सभागृहात अनेक प्रश्न मांडले आणि तडीस नेण्याचे काम शेतकरी कामगार पक्षाने केले आहे, असे जयंत पाटील म्हणाले.

भविष्यात कुरुळ ग्रामपंचायत नगरपालिकेत विलीन होईल, विकासाची कवाडे अधिक उघडली जातील, अलिबाग तालुका वीस वर्षांनी मागे गेला आहे, अर्थसंकल्पीय अधिवेशनात विकासासाठी मुद्दे सादर करणे गरजेचे असताना महायुतीच्या आमदाराने विकासाचा दृष्टिकोन ठेवला नाही, यामुळे अपेक्षित विकासकामे होऊ शकली नाहीत. मर्यादा उल्लंघन केल्याने अलिबागचे नाव खराब केले आहे, पैसे घेऊन पक्ष बदलणाऱ्या आमदाराला मतदार राजकारणातून हद्दपार करणार यात तिळमात्र शंका नाही, असे जयंत पाटील म्हणाले.

कोरोना काळात शेतकरी कामगार पक्षाने गरजूंना धान्यवाटप केले, तळागाळात शिक्षणाची गंगा पोहोचविण्याचा प्रयत्न केला, विद्यार्थिनींना शाळेत जण्यासाठी आणि शिक्षणाला गती मिळावी यासाठी सायकल वाटप केल्या, मतदारसंघातील जनतेला दृष्टी मिळावी यासाठी चष्मे दिले आहेत, त्यामुळे अलिबागच्या जनतेने दूरदृष्टी ठेवून सुशिक्षित असणाऱ्या उमेदवाराच्या पाठीशी उभे राहावे आणि अलिबाग विधानसभा मतदारसंघाचा सर्वांगीण विकास साधावा, असे आवाहन जयंत पाटील यांनी केले.

अलिबाग विधानसभा मतदारसंघातील जनता आमदाराच्या वागणुकीला कंटाळली आहे. शेतकरी कामगार पक्षाच्या उमेदवाराला महाविकास आघाडीतील घटक पक्ष जिद्दीने उभे राहिले आहेत. मतदारसंघात काँग्रेस, उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गट, आम आदमी पार्टी असे विविध पक्ष मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करीत आहेत, त्यांच्या या कामगिरीचे फलित निश्चित मिळणार असून, महाविकास आघाडीच्या उमेदवार विधानसभेत प्रतिनिधित्व करणार आहेत, असे जयंत पाटील म्हणाले.

अलिबाग-मुरुड-रोहा विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीचे कार्यकर्ते घरोघरी पोहोचले आहेत. मतदारांना सन्मान देण्याचे काम प्रचाराच्या माध्यमातून केले जात आहे. शेतकरी कामगार पक्षाच्या खांद्याला खांदा लावून घटक पक्षाने काम करण्यास चिडीने सुरुवात केली आहे. यामुळेच महाविकास आघाडीचे उमेदवार विजयाच्या उंबरठ्यावर पोहोचले आहेत, असे जयंत पाटील म्हणाले.

## पक्षाचे काम करण्यावरून जीवघेणा हल्ला


सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी शर्तीचे प्रयत्न केले आहेत. ऑल आऊट मिशनपासून रुट मार्चसारखे उपक्रम राबविले. परंतु, अलिबागसह अनेक भागात निवडणुकीच्या निमित्ताने होणाऱ्या हाणामारी व जीवघेणा हल्ला करणाऱ्यांवर अंकुश ठेवण्यास पोलीस अपयशी ठरल्याची चर्चा आहे. मागील दोन दिवसांपूर्वी एकदरा या ठिकाणीदेखील प्रचाराला गेलेल्या तरुणांवर हल्ला करण्याचा प्रयत्न महेंद्र दळवी यांच्या समर्थकांनी केला. या दोन्ही घटनानंतर जिल्ह्यातील मतदान व मतमोजणी प्रक्रिया सुरळीत व शांततेत पार पाडण्यासाठी पोलीस प्रयत्न करतील का, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

## निवडणूक निरीक्षकांकडून मतदान केंद्रांची पाहणी

श्रीमती रुही खान यांनी मतदान केंद्रांवर निवडणूक भारत आयोगाच्या सूचनेप्रमाणे किमान आवश्यक सुविधा उपलब्ध असल्याची पाहणी केली. या केंद्रांबाहेर प्रकाशाची व्यवस्था करावी, असे सांगितले. प्रौढ, स्तनदा माता किंवा आवश्यकप्रमाणे बेंचेस, खुर्च्यांची व्यवस्था करावी, असे सांगितले. दिव्यांग व वृद्ध मतदारांना मतदान केंद्रावर सुलभपणे जाता यावे, यासाठी रॅम्पची उभारणी करण्यात यावी. निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनानुसार मतदान केंद्रावर सुविधांची निर्मिती करण्यात यावी, अशा सूचना यावेळी त्यांनी दिल्या.

मतदानाच्या दिवशी मतदारांना केंद्रावर सुरळीत प्रवेश, मार्गदर्शक सूचना, दिशादर्शक आणि सुरक्षा कर्मचाऱ्यांची तैनाती याबाबत त्यांनी माहिती घेतली. निवडणूक प्रक्रियेदरम्यान नियमांचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी, असेही त्यांनी सांगितले.

# शेतीकामाला जोरदार सुरुवात



**। सोगाव । वार्ताहर ।**

जगाचा पोशिंदा असलेल्या रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या शेतात यावर्षी पिवळ्या भाताचे सोन्याचे पीक बहरून व भरभरून आल्याने शेतकरी मोठ्या आनंदात आहे. पावसाने यावर्षी अगदी वेळेत उघडीप दिल्यामुळे आपल्या शेतात बहरून आलेले भाताचे पीक घरी आणण्याची घाई अलिबाग तालुक्यातील मापगाव विभागातील शेतकरी करताना दिसत आहे.

यावर्षी मापगाव पंचक्रोशीतील बहुतांश भातशेतामध्ये चांगल्या दर्जाचे पीक आले आहे, यामध्ये भातपिकासाठी शेतकऱ्यांनी कर्जत, रूपाली, जया, शुभांगी, साई, सुवर्णा आदींसह भात बियाण्यांची लागवड केली होती. यावर्षी पावसाने कृपादृष्टी दाखवल्यामुळे शेतामध्ये समाधानकारक शेतीयुक्त पाऊस पडल्याने मोठ्या प्रमाणात भातपीक आले. यामुळे सर्व शेतीमध्ये जणू सोनेरी शाल पांघरल्या सारखे दिसून येत आहे. यामुळे याभागातील शेतकरी मोठा आनंदात आहे.

शेतकऱ्यांनी भातकापणी व मळणीच्या कामांना जोरदार सुरूवात केली आहे. शेतावर काम करणाऱ्या शेतमजुरांची मजुरीचे दर वाढल्यामुळे व मजुरांचा तुटवडा होत असल्याने कापणी व मळणी कामासाठी काही प्रमाणात शेतकरी हवालदिल झाला आहे.

## समुद्रकिनारी रांगोळीद्वारे क्षयरोग जनजागृती

**। कोर्लई । वार्ताहर ।**

जिल्हा क्षयरोग विभाग अलिबाग-रायगड यांच्या मार्गदर्शनाखाली क्षयरोग पथक मुरुड यांनी दिवाळीच्या सुट्टीचे औचित्य साधून समुद्रकिनारी रांगोळी काढून क्षयरोग जनजागृती करण्यात आली.



या रांगोळीच्या माध्यमातून अनेक पर्यटक, स्थानिक व्यावसायिक, स्थानिकलोकांमध्ये क्षयरोगाची माहिती पोहचण्यास मदत झाली. जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. सचिन जाधव, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. पायल राठोड, वैद्यकीय अधिकारी डॉ. अक्षयराज राठोड यांनी समुद्रकिनारी भेट देऊन भव्य रांगोळीची पाहणी केली. तसेच उपस्थित पर्यटकांना क्षयरोगाची माहिती दिली. ही रांगोळी काढण्यासाठी मुरुड तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयातील कर्मचारी प्राची चौलकर, मयुरी कदम, सिद्धी माने, दर्पणा चोगले, राजेंद्र चुनेकर, गणेश शिंदे, संकेत घरत, शालिकराव पावरा, मयूर पाटील, नंदकुमार घाडगे, प्रणय धसाडे व आशा स्वयंसेविका यांनी परिश्रम घेतले.

## तळा पोलिसांचे शहरातून रूट मार्च

**। तळा । वार्ताहर ।**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तळा पोलिसांकडून शहरात रूट मार्च काढण्यात आला. आगामी विधानसभा निवडणुकीत शहरात नागरिकांकडून कायदा व सुव्यवस्था राखण्यात यावी, तसेच नागरिकांच्या सर्व हालचालींवर पोलीस लक्ष ठेवून असल्याची जाणीव करून देण्यासाठी पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या आदेशानुसार हा रूट मार्च काढण्यात आला.



शहरातील बळीचा नाका, नगरपंचायत नाका, वरचा मोहल्ला, मुळे नाका, मेठ मोहल्ला, आसावरी नाका आदी ठिकाणी हा रूट मार्च काढण्यात आला. या रूट मार्चमध्ये एस.एस.बी.चे २ अधिकारी व ४८ जवान तसेच आर.सी.पी. प्लाटून माणगाव यांचे १+३१ जवान व पोलीस ठाण्याकडील ०१ अधिकारी व १५ पोलीस अंमलदार असे एकूण ०३ अधिकारी व ९४ पोलीस जवान हजर होते.

कृषीवल
रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
www.krushival.in
मंगळवार दि. १२ नोव्हेंबर, २०२४



# गर्दी जमवण्यासाठी भाजपचा आटापिटा




। पनवेल । प्रतिनिधी ।

पनवेल विधानसभा मतदार संघातून चौथ्यांदा निवडणूकीसाठी उभे असलेले प्रशांत ठाकूर यांच्या प्रचारार्थ रविवारी (दि.१०) ठाकूर यांच्या प्रचारासाठी केंद्रीय मंत्री आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाचे नेते रामदास आठवले यांच्या सभेचे आयोजन कामोठे येथे करण्यात आले होते. या सभेत गाण्याचे कार्यक्रम आणि जादूचे प्रयोग ठेवून गर्दी जमवण्याचा आटापिटा भाजपा कार्यकर्त्यांना करावा लागला. महायुती तर्फे पनवेल विधासभेची निवडणूक लढवत असलेले आ. प्रशांत ठाकूर मतदार संघात विकास कामे करण्यात सपशेल अपयशी ठरले आहेत. तीनवेळा आमदार राहूनही मतदार संघातील समस्या जैसे थे असल्याने मतदारसंघात आ. ठाकूर यांच्या विरोधात प्रचंड नाराजी आहे.

**■ कार्यकर्त्यांना खिळवून ठेवण्यासाठी गाण्याचे कार्यक्रम व जादूच्या प्रयोगाचे आयोजन**

याचमुळे निवडणुकीच्या प्रचारासाठी महायुतीच्या पदाधिकाऱ्यांना भाड्याने कार्यकर्ते आणावे लागत आहेत. सभांना अपेक्षित गर्दी जमा होण्यासाठी वेळ लागत असल्याने जमलेल्या कार्यकर्त्यांना एका ठिकाणी खिळवून ठेवण्यासाठी तसेच गर्दी जमवण्यासाठी गाण्याचे तसेच जादूचे प्रयोग सभेच्या स्टेजवर आयोजित करण्याची वेळ भाजपा कार्यकर्त्यांवर ओढावली आहे.

## कुर्ले बौद्धवाडीतील शिंदे गटाला भगदाड



**महाड :** महाड तालुक्यातील कुर्ले बौद्धवाडी येथील शिंदे गटाच्या शिवसैनिकांनी महाविकास आघाडीच्या उमेदवार स्नेहल जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षात प्रवेश केला आहे. या पक्षप्रवेशादरम्यान स्नेहल जगताप म्हणाल्या की, आधी भोमजई येथील शिंदे गटाच्या शिवसैनिकांनी प्रवेश केला आणि आता कुर्ले येथे होत असलेल्या पक्ष प्रवेशाचा अर्थ लोकांना या निवडणुकीत निश्चितपणे बदल हवा आहे. निष्क्रिय आमदारांना कंटाळून येथील संपूर्ण बौद्धवाडीने पक्षप्रवेश केला आहे. येत्या विधानसभा निवडणुकीत जनता नक्कीच बदल घडवून आणणार असून गद्दारांना त्यांची जागा दाखवून देऊ, असे स्नेहल जगताप यांनी सांगितले.

## खोपोलीत सुनील पाटील यांना जोरदार धक्का



**कर्जत :** काही दिवसांपूर्वी उद्धव ठाकरे यांना फसवून शिंदे गटात गेलेले सुनिल पाटील यांच्या ताकई गावातील राकेश पाटील यांच्यासह असंख्य तरूणांनी शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षात प्रवेश केला आहे. कर्जत शहराचा मोठा नेता म्हणून मिरवणाऱ्या सुनिल पाटील यांना हा मोठा धक्का असून कर्जत विधानसभा मतदार संघातील महाविकास आघाडीचे उमेदवार नितीन सावंत यांची ताकद वाढली आहे. सुनिल पाटील हे ठाकरे गटातून विधानसभेची निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक होते. मात्र, मातोश्रीवर उद्धव ठाकरे यांच्यात झालेल्या बैठकीत सुनिल पाटील यांनी माघार घेत नितीन सावंत यांना निवडून आणण्याचा शब्द ठाकरे यांना दिला होता. परंतु, आठवड्यातच सुंनिल पाटील यांनी उद्धव ठाकरे यांना फसवून शिंदे गटात प्रवेश केला. या नाट्यमय घटनेने सुनिल पाटील यांच्या विरोधात सकल मराठा समाज, खोपोली शहरातील सर्वसामान्य जनता, तरूण वर्ग नाराज झाली होती. यामुळे नितीन सावंत यांच्या कार्यप्रणालीवर प्रेरित होत ताकई गावातील युवानेते राकेश पाटील यांच्या नेतृत्वाखाली असंख्य तरूणांनी शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षात जाहिर पक्षप्रवेश केला. यावेळी तालुका प्रमुख एकनाथ पिंगळे, माजी उपसभापती पंढरीनाथ राऊत, जगदीश ठाकरे, संपत हडप, योगेश घोलप, भरत पिंगळे आदी उपस्थित होते.

## स्नेहल जगताप यांच्यावर नागरिकांचा विश्वास



**महाड :** महाड विधानसभा मतदार संघातील महाविकास आघाडीच्या उमेदवार स्नेहल जगताप यांच्या प्रचारार्थ शहरातील शिंपी आळी वार्डमधील शिवसेना (उद्धव ठाकरे) यांच्यावतीने प्रचार दौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महाड बाजारपेठेतील व्यावसायिकांसह महिलांच्या विविध समस्या स्नेहल जगताप याच सोडवू शकतात, असा विश्वास येथील नागरिंकामध्ये असल्याचे निदर्शनास आले. यावेळी कौशिक पोरे, पराग टमके, प्रदीप मुळे, सुहास तलाठी, दीपक पोटे, साहिल हेलेकर, राजा मुळे, रितेश वनारसे, केदार रवळेकर, प्रथम टमके, यश हेलेकर, साहिल शेठ, श्रेयश शेठ, दीपक शेठ, दीपक पोटे, श्रीकांत पोटे, अजिता मुळे, रुचिता मुळे, स्वाती वनारसे, माधुरी वनारसे, वैशाली वनारसे, मधुमती रवळेकर, आरती हेलेकर, स्नेहा हेलकर, अक्षया हेलेकर, रेवा मुळे, संचिता मुळे, ऐश्वर्य शेठ, शीतल शेठ, आहुजा सलागरे, मनाली पोरे आदींसह कार्यकर्ते व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- प्रथम पुर्नविवाह, व्यंग, सर्वजातीय, आंतरजातीय वेबसाईटसह स्थळांसाठी रोहा गणेश महाकाळ ८८८८९३५७७५
- अलिबागमधील कार्यालयासाठी कर्मचारी आवश्यक आहेत. पदवीधर मुलाखतीसाठी येऊ शकतात. संपर्क : ९९२३७५०५४९ वेळ : सकाळी ११ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत
- नागाव मधील हॉटेल मध्ये काम करण्यासाठी स्टाफ ची आवश्यकता आहे . अकाऊंटंट ( पेमेंट - १२००० ) हाऊस कीपर ( पेमेंट- ९५००) रिसेप्शन ( पेमेंट - १२०००) १ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअॅप वर मेसेज करावा. मोबाईल - ७५५९१८४६१२
- वर्कशॉपमध्ये कामाला मुले पाहिजेत १० वी १२ वी पास/नापास पगार १२००० रूपये १२ तास ड्युटी ठिकाण- बामणसुरे, चोंढी नंबर- ९१४५४५०२९७/ ९५७९२५८८९२
- Design Metrics is Hiring. Need a Draftsman/ Sit Supervisor at our Studio in Alibag. Skills required - Autocad / Site knowledge. Kindly share your CV on designmetricsoffice@gmail.com. Contact No - 9970051876
- भारतगॅस वितरक मे.जे.बी.जगे अॅण्ड सन्स्, अलिबाग फुलटाईम/ पार्ट टाईम कामासाठी मुले पाहिजेत संपर्क - ९३५९८८५६७६

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## भाजप अध्यक्षांचा शेकापमध्ये प्रवेश



। उरण । प्रतिनिधी ।

सोनारी गावातील भाजपचे अध्यक्ष प्रकाश कडू यांनी प्रीतम म्हात्रे यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवून शेतकरी कामगार पक्षात जाहिर प्रवेश केला आहे. यामुळे भाजपला खिंडार पडले आहे.

विधानसभा निवडणूकीचा प्रचार उत्तरोत्तर रंगत असताना, जनतेच्या प्रश्नांशी बांधीलकी ठेवणाऱ्या शेतकरी कामगार पक्षाकडे सर्वसामान्य कार्यकर्ते, नेते यांचा ओघ मोठ्या प्रमाणात सुरु असून तो दिवसोंदिवस वाढतच आहे. यावेळी प्रीतम म्हात्रे यांच्या उपस्थितीत सोनारी गावातील भाजपचे अध्यक्ष प्रकाश कडू यांनी शेतकरी कामगार पक्षात जाहीर प्रवेश केला आहे. शेतकरी कामगार पक्षच खऱ्या अर्थाने लोकांच्या प्रश्नावर लढतो. यामुळे आम्ही शेतकरी कामगार पक्षाचे कार्य करणार असल्याचे प्रकाश कडू यांनी सांगितले.







**● महाविकास आघाडीच्या उमेदवार चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांचा वेश्वी गावात जोरदार प्रचार करण्यात आला. गावदेवी मंदिरात नारळ वाढवून प्रचाराला सुरुवात करण्यात आली. तरुणांसह महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. वेश्वी ग्रामपंचायतीचे माजी सरपंच प्रफुल्ल पाटील, काँग्रेसचे माजी तालुका अध्यक्ष योगेश मगर, उपसरपंच आरती पाटील, विष्णू मगर, माजी उपसरपंच नरेश पडियार, अरुण पाटील यांच्यासह तरुण, तरुणी व महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.**
(छायाचित्र : समीर मालोदे)

## खारघरमध्ये सुवर्णकोल्हा मृतावस्थेत
### पर्यावरणप्रेमींनी व्यक्त केली चिंता

। पनवेल । वार्ताहर ।

खारघरमध्ये काही महिन्यांपूर्वी सुवर्णकोल्ह्याचे अवशेष आढळले होते. मृतदेह कुजलेल्या अवस्थेत सापडल्याने नेमका या कोल्ह्याचा मृत्यू कशामुळे झाला याचे कारण समजू शकले नाही. यातच खारघरमधील सेक्टर-१५ मध्ये रविवारी (दि.१०) रात्रीच्या सुमारास खारघरवासियांना सुवर्णकोल्हा मृतावस्थेत आढळला आहे. यामुळे पुन्हा एकदा वन्यजिवांच्या संरक्षणाचा मुद्यावर पर्यावरण प्रेमींनी चिंता व्यक्त केली आहे.

मागील अनेक महिन्यांपासून प्राण्यांसाठी काम करणाऱ्या महाराष्ट्र शासनाच्या प्राणी कल्याण कायदा संनियत्रण समितीच्या मानद प्राणी कल्याण अधिकारी सिमा टँक यांचा एक सहकारी रविवारी खारघरमध्ये रात्री गस्त घालताना होता. त्यांना सेक्टर-१५ मधील डी.ए.व्ही. शाळेजवळ रात्री



श्वानासारखा दिसणारा प्राणी मृतावस्थेत दिसला. तेथे सिमा टँक व त्यांचे सहकाऱ्यांनी तो सुवर्णकोल्हा असल्याची खात्री केली. मृतावस्थेत कोल्ह्याची माहिती पनवेलच्या वन विभागाच्या अधिकाऱ्यांना देण्यात आली. वन विभागाचे कर्मचारी घटनास्थळी पोहचल्यानंतर मृतावस्थेमधील कोल्ह्याचा मृतदेह ताब्यात घेण्यात आला.

या घटनेनंतर पनवेल, तळोजा ते वाशीपर्यंत पसरलेल्या खाडीपात्रालगतच्या प्राण्यांच्या सुरक्षेबाबत शासन गंभीर नसल्याने प्राणीप्रेमींकडून संताप व्यक्त होत आहे. या घटनेची माहिती प्राणी कल्याण अधिकारी सिमा टँक यांनी समाजमाध्यमांवर दिली. याबाबत वन विभागाच्या अधिकाऱ्यांना संपर्क साधला मात्र संपर्क होऊ शकला नाही.

> ज्या पद्धतीने नागरिकरणासाठी नवे शहर उभारणीचे काम जोरदार सुरु असल्याने पाणथळ आणि कांदळवण क्षेत्रालगत लोकांचा वाढलेल्या अतिक्रमणामुळे प्राणी आणि पशूंचे अधिवासाचे क्षेत्र कमी होऊन ते रस्त्यावर आणि शहरीभागात दिसू लागले आहेत. जेथे प्राण्यांचे घर आहे तेथे मासेमारी करणे, रात्र पार्ट्या केल्या जात आहेत. हे सर्व खारघरमध्ये सुरु आहे. प्राण्यांना इतर ठिकाणी स्थलांतरीत करु शकत नाही त्यामुळे पनवेल महापालिका आणि वन विभागाला पशूप्राण्यांचे नैसर्गिक वास्तव्यांच्या ठिकाणांना सुरक्षित ठेवण्याची विनंती केली आहे. मागील पाच महिन्यांतील ही दुसरी घटना आहे.
>
> - सिमा टँक, प्राणी कल्याण अधिकारी, प्राणी कल्याण कायदा संनियत्रण समिती

## लुटमार करणारे गुन्हेगार गजाआड

। पनवेल । वार्ताहर ।

पनवेल परिसरात वाहन भाडे तत्वावर ऑफलाईन बुक करून निर्जनस्थळी काही बहाण्याने उतरुन संबंधित चालकाला चाकूचा धाक दाखवून गाडीसह चालकाला लुटून पसार होणाऱ्या सराईत गुन्हेगारांना तळोजा पोलिसांनी गजाआड केले आहे. तसेच, त्यांच्याकडून आतापर्यंत ४ गुन्हे उघडकीस करण्यात आले आहेत. यानंतर तळोजा पोलिसांनी या परिसरातील तांत्रीक तपासाच्या आधारे अधिक माहिती घेतली. यावेळी गुन्ह्यातील प्रमुख आरोपी सागर गोयल (२५) व त्याचा सहकारी संतोष नाटेकर (२७) हे हाजीमलंग कल्याण परिसरात लपल्याची माहिती मिळाली. तळोजा पोलिसांनी सलग तीन दिवस त्या ठिकाणी सापळा रचून या दोघांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून आतापर्यंत २ लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल तसेच गुन्ह्यातील सेलेरिओ गाडी हस्तगत करण्यात आली आहे. या आरोपींमुळे अजूनही काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

## नेरळ ग्रामपंचायतीकडून आश्वासक बदल

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील लोकसंख्येनी मोठी असलेल्या नेरळग्रामपंचायतीमध्येस्थानिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत होते. ग्रामपंचायत विसर्जित झाल्यामुळे या ग्रामपंचायतीमध्ये प्रशासकीय राजवट बसली आहे. प्रशासक सुजित धनगर यांनी घेतलेल्या निर्णयानुसार नेरळ बाजारपेठेतील कचरा आता रात्रीच उचलला जाऊ लागला आहे.

नेरळ ग्रामपंचायत हद्दीत नागरीकरण वेगाने होत असल्याने स्थानिक ग्रामस्थांच्या अडचणी आणि समस्यांवर मार्ग निघत नव्हता. यामुळे ग्रामसभेत समस्यांचा पाऊस पडायचा. जिल्हा परिषद लघु पाटबंधारे विभागातील उपअभियंता या पदावरील सुजित धनगर यांनी प्रशासक म्हणून कामकाज सुरु केल्यानांतर नेरळ ग्रामस्थ काही प्रमाणात आश्वस्त झाले आहेत. प्रशासक यांनी ग्रामपंचायती मधील



सर्व कर्मचारी यांनी विश्वासात घेत प्रसंगी पहाटे सहा वाजण्यापूर्वी तर कधी रात्री अकरा पर्यंत फिल्डवर उभे राहून कर्मचाऱ्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच, नेरळ गावातील बाजारपेठेतील कचरा संकलन आता रात्रीच होऊ लागले आहे. रात्री आठपासून अकरा वाजेपर्यंत मुख्य बाजारपेठ, जुनी बाजारपेठ तसेच खांडा पर्यंत आणि अन्य रस्त्यांवरील सर्व दुकानदार यांना कचरा हा घंटा गाडीत टाकण्यात यावा, अशी सूचना केली आहे.



(छायाचित्र- समीर मालोदे)





**● शेकाप उमेदवार चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांच्या प्रचारार्थ वेश्वी ग्रामपंचायत हद्दीतील वाडगावफाटा, नांदपपाडा, गोकुळेश्वर येथे प्रचार करण्यात आला. यावेळी माजी सरपंच प्रफुल पाटील, काँग्रेसचे माजी तालुकाध्यक्ष योगेश मगर आदी सहभागी झाले होते.**

# कर्जत स्थानकात अंधाराचे साम्राज्य

**। नेरळ । प्रतिनिधी ।**



कर्जत या महत्त्वाच्या रेल्वे स्थानकात फलाट दोन आणि ईएमयू फलाटावर मुंबई दिशेकडे प्रचंड प्रमाणात काळोख असतो. त्या भागातील विजेचे दिवे अगदी मंद प्रकाश देत असल्याने कर्जत स्थानकात अंधार दाटलेला दिसत असून, महिला प्रवाशांची सुरक्षा समोर आली आहे.

मध्य रेल्वेवरील मुंबई पुणे मेन लाईनवरील मध्यवर्ती असलेले रेल्वे स्थानक म्हणून कर्जत रेल्वे स्थानक ओळखले जाते. या स्थानकातून पुण्याकडे जाणाऱ्या सर्व मेल एक्स्प्रेस गाड्यांना अतिरिक्त इंजिन लावण्यात येते. पूर्वी कर्जत रेल्वे स्थानक हे जंक्शन रेल्वे स्थानक होते. मात्र, खोपोली येथे जाणाऱ्या गाड्या उपनगरीय लोकल गाड्या म्हणून थेट जाऊ लागल्याने कर्जत स्थानक हे जंक्शन स्थानक राहिले नाही. मात्र, कर्जत रेल्वे स्थानकाचे महत्त्व मोठे असून, मेल एक्स्प्रेस गाड्यांचा थांबा पुण्याकडे घाट सेक्शनमध्ये जाताना घ्यावा लागत असल्याने कर्जत स्थानकाचे महत्त्व मोठे आहे. मध्य रेल्वे मेन लाईन मार्गावरील कर्जत मुख्य स्थानक असून, मुंबई आणि पुणे या दोन्ही महानगरांच्या मध्यभागी असलेले स्थानक म्हणून वेगळी ओळख आहे.

कर्जत स्थानकातून मुंबईकडे जाणाऱ्या उपनगरीय लोकल पहाटे अडीचपासून रात्री अकरापर्यंत सुरू असतात. मात्र, असे असतानादेखील कर्जत स्थानकात असुविधा यांची वानवा दिसून येत आहे.कर्जत स्थानकात फलाट दोन आणि इएमयू फलाट वरील मुंबई दिशेकडे प्रवासी वर्गाला उन्हा तान्हात उभे राहावे लागते. निवारा शेड नसल्याने दिवसभरात प्रवास करणारे प्रवाशांचे हाल होत असतात. मात्र, सायंकाळनंतर येणारे प्रवासी यांना काळोखाचा त्रास सहन करावा लागतो. कर्जत स्थानकातील ईएमयू फलाट आणि दोन नंबरच्या फलाटावरील विजेचे दिवे हे अंधुक प्रकाश देणारे आहेत. त्यामुळे कर्जत स्थानकात उपनगरीय लोकलची वाट पाहत बसणारे प्रवासी यांना अंधारात उभे राहावे लागते. त्याचवेळी महिला प्रवासी यांना अंधारात उभे राहात लोकलची वाट पाहावी लागल्याने महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. मध्य रेल्वेकडून बहुसंख्य स्थानकात एलईडी दिवे लावले आहेत. मात्र, कर्जत स्थानकात दिव्यांच्या खालीदेखील उजेड नसल्याने महिला प्रवाशांची कुचंबना होत आहे. त्यामुळे रेल्वे प्रशासनाने विजेचा प्रश्न सोडविण्याची मागणी प्रवासी करीत आहेत.

# शेतजमीन मोजणी फीमध्ये वाढ

**। सुधागड-पाली । वार्ताहर ।**

सध्या संपूर्ण महाराष्ट्रात सरकारी कार्यालयात ऑनलाइन कारभाराचे वारे वाहू लागलेले आहेत. अश्यातच शासनाच्या अधिकृत जमीन मोजणी कार्यालयानेदेखील त्यांचा मोजणीचा सर्व कारभार ऑनलाइन पद्धतीने सुरु केला असून, त्यासाठी सर्वच प्रकारच्या मोजणीसाठी अर्ज भरावे लागत आहे. प्रथमदर्शनी चांगली वाटणारी ही योजना आता शेतकरी तसेच नागरिकांना तापदायक आणि खर्चिक भासू लागली आहे.

या ऑनलाइन मोजणी संकेतस्थळाला आता कर्मचारीदेखील कंटाळू लागले आहेत. बऱ्याचदा हे संकेतस्थळ बंद असते अथवा अडकून राहते, त्यामुळे नागरिकांना नाहक त्रासाला सामारे जावे लागत आहे.

सदरच्या संकेतस्थळावर मोजणी अर्ज भरताना एवढी किचकट प्रक्रिया ठेवलेली आहे, जेणेकरून सामान्य नागरिकांना अथवा गरीब शेतकऱ्यांना ती भरताच येत नाही. तसेच यामध्ये अर्ज भरताना शासनाने साधी मोजणी, तातडी मोजणी, अति तातडी मोजणी आणि अति अति तातडी मोजणी असे तातडीच्या मोजणीचेच तीन प्रकार केल्याने शेतकरी व सामान्य नागरिकांना नाहक जास्तीचे मोजणी आकारणी शुल्क भरावे लागत आहे, जे कधी एकरी बारा हजार रुपयेदेखील येते, त्यामुळे हा नाहकचा भुर्दंड नागरिकांना सहन करावा लगत आहे. पूर्वी तातडी आणि अति तातडी असे दोनच प्रकार असताना अति अति तातडी प्रकार का आण्यात आला, हा संशोधनाचा विषय आहे. जे खातेदार अति अति तातडीचे शुल्क भरतात त्यांना लगेचच मोजणी तारीख मिळते; परंतु गरीब शेतकऱ्यांना मात्र चार महिन्यांनंतर मोजणीची तारीख मिळत असल्याने शेतकऱ्यांमध्ये असंतोष पसरत आहे.

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल, श्री. सुनील यशवंत पालांडे, यांनी जमीन मालक श्री. अनंता विष्णू म्हसे, यांचेकडून त्यांचे ताबेकब्जा वहिवाटीतील, व मालकीची, आणि भोगवटासदरी नावे असलेली खालील वर्णनाची जमीन मिळकत, कायमची विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**मौजे - अंजप, ता. कर्जत, जि. रायगड, येथील मिळकत**

| सर्व्हे नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| ८/६ | ०.५३.००<br>पो.ख. ०.०६.४०<br>एकूण ०.५९.४०<br>या एकूण क्षेत्रापैकी ०.३०.०० हे. आर पॉ. इतके क्षेत्र श्री. सुनील यशवंत पालांडे यांना विकत दिलेले आहे. | १.५० |

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत, इतर दुसरे कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकवीस) दिवसांचे आत खालील सही करणार अॅडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास, आमचे अशिल सदर मिळकत विकत घेण्याचा व्यवहार, म्हणजेच खरेदीखत करून पूर्ण करतील. तसेच मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कळावे
**अॅड. संदिप मारूती घरत**
ऑफिस: श्री साई सावली, सो.लि. दुसरा मजला,
कर्जत दि. १२/११/२०२४ ब्लॉक नं. १०, कर्जत दिवाणी कोर्टासमोर,
ता. कर्जत, जि.रायगड, पिन-४१०२०१.
मो. ९२२०६५३३०२/८४४६७२४९८८

# नागोठण्यातील अवैध धंद्यांना चाप

**। नागोठणे । वार्ताहर ।**

### पोलिसांच्या कारवाईत अनेक गुन्हे दाखल

विधानसभा निवडणूक आचारसंहितेच्या काळात कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून नागोठणे पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली नागोठणे पोलीस ठाण्यातील सर्व पोलीस यंत्रणेकडून नागोठणे विभागात सर्वत्र करडी नजर ठेवण्यात येत आहे. आचारसंहितेच्या काळात कोणतीही गडबड होऊ नये म्हणून नागोठणे पोलीस यंत्रणेकडून नागोठणे शहर व विभागातील विविध प्रकारच्या अवैध धंद्यांविरोधात गुन्हे दाखल करून व अवैध धंदे बंद करून चाप लावला आहे.

नागोठणे शहरात चालणारा अवैध मटका धंदा बंद अवस्थेत आहे. याशिवाय नागोठणे ग्रामीण विभागातील गावांत व आदिवासी वाड्यांवरील अनेक ठिकाणी पोलिसांनी छापे टाकून गावठी दारूची निर्मिती करणाऱ्या भट्टी उद्ध्वस्त केल्या आहेत. तसेच गावठी दारू विक्रीचे धंदे करणाऱ्यांविरोधात गुन्हेही दाखल केले आहेत. त्यामुळे अवैध करणाऱ्यांमध्ये घबराट पसरली आहे.

# स्विफ्ट कारचा अपघात

**। पाली । वार्ताहर ।**

खोपोली राज्य महामार्गावर नाणोसे गावानजीक दि.७ रोजी मारुती सुझुकी कंपनीच्या स्विफ्ट कारला मोठा अपघात झाला. खोपोलीहून पालीच्या दिशेने जात असताना अचानक चालकाचा गाडीवरील ताबा सुटून गाडी रस्त्यालगत असलेल्या खड्ड्यात कोसळली. सुदैवाने यात कोणालाही दुखापत झाली नाही. मात्र, गाडीचे नुकसान झाले.


## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



**मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.**

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## जाहीर नोटीस

दि.११/११/२०२४

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. उमेश कृष्णा पाटील यांनी खालील नमुद केलेली मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरच्या मिळकतीच्या विक्री संबंधीत बोलणी विद्यमान मालक श्री. गिरीश विनायक सिनकर व आमचे आशिल श्री. उमेश कृष्णा पाटील यांचेसोबत झालेली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे.

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | सिटी सर्व्हे क्र. | क्षेत्र (चौ.मी) | सत्ताप्रकार |
|---|---|---|---|
| आंबेपूर ता.अलिबाग | ४२२ | ३०० | क |

वर नमूद केलेली मिळकत या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या मुळ सही शिक्याची कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या ७ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधन कारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

**अॅड. आशिष नरेंद्र म्हात्रे**
मु. पेझारी (पळी आंबेघर), पो.पोयनाड
ता. अलिबाग, जि. रायगड.
मोबा. नं. ९२७३२७३८४३/९६३७२७००१९

# गोपाळ थोरवे यांचे निधन

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील धाकटे वणगांव येथील गोपाळ थोरवये यांचे बुधवारी (दि.६) वयाच्या ८४ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा, मुली, बहिणी, सुना, नातवंडे, पंतवडे, जावई असा मोठा परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी शुक्रवारी (दि.१५) श्री क्षेत्र तमनाथ येथे होणार आहेत. तसेच, त्यांचे उत्तरकार्य मंगळवारी (दि.१९) वेणगांव-कर्जत येथील त्यांच्या निवास स्थानी होणार आहेत. यावेळी संदिप यादव यांचे सकाळी १० वाजता प्रवचन होणारा असल्याचे थोरवे कुटुंबीयांकडून सांगण्यात आले आहे.


## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

\- मुख्य संपादक


O.W NO. नोंदणी शाखा 2601/2024
Public Trusts Registration Office, Raigad
Address: Public Trust Registration Office, Raigad,
Kalpataru Building, Near Main Post Office, Alibaug,
Raigad Raigarh, Raigarh, Raigarh
दि. ११-११-२०२४

## Public Notice

**Service Request Number**: RGD/14540/18/24
**Inquiry/case No.:** 442124
**Name of the Trust:** K S FOUNDATION TALOJA RAIGAD
**Address of the Trust**: FLAT NO 1307 SKYLINET PLOT NO 14, PH 1 SECTOR 7, TALOJA PANCHNAD TALOJA RAIGADRaigarh, Panvel, Taloje Majkur
**Registration Number of the Trust (if)** :K S FOUNDATION TALOJA RAIGAD
**Name of the Applicant :** MOHAMED SIYAD
**To**
**All Concerned having interest**

Whereas in the above application under section 19 of the Maharashtra Public Trust Act 1950, an enquiry is to be made under section 19 of the said Act, on the following points by the Asst. Charity Commissioner, Greater Mumbai Region.
1. Whether a Trust in the respect of the above exists and whether such Trust is a public Trust?
2. Whether any of the following properties are the properties of such Trust?

**Movable Property**

| SR | Property Details | Estimated Value |
|---|---|---|
| 1 | CASH | 3003.00 |

**Value of Movable Property** : Rs. 3003/- Only
(In Words Rs. Three Thousand And Three Only)

**Immovable Property**

| SRNO | Town Or Village | CS Or Municipal Or Survey No | Area | Assessment Or Judiciary | Tenure Or Nature | Estimated Value |
|---|---|---|---|---|---|---|

**Value of Immovable Property** : Rs. /- Only
(In Words Rs. Only)

This is to call upon you to submit your objections or any evidences if any, at the above office address within 30 days from the date of publication of this notice in written. If not received anything within given period, the inquiry would be completed & necessary orders will be passed. If no objections are received within the stipulated time then further inquiry would be completed and necessary orders will be passed.

This notice given under my hand and seal of the Office on this date 11/11/2024.

Copy :- 1) On address of the property mentioned above.
2) On Address of the Trust.
3) For Publication in Local Daily News Paper.
4)On Notice Board of this Office
5) (if any Other Please mentioned)..........
{Note: Please ✓ mark the appropriate option}

**Superintendent**
**Public Trusts registration office Raigad**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की, मौजे पोसरी ता.कर्जत जि.रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे आशिलांनी कब्जेदारांकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे पोसरी ता. कर्जत जि.रायगड येथील जमिन मिळकत**

| जमिन मालकाचे नाव | स.नं. | हिस्सा नं | क्षेत्र.आर.पॉ. | आकार रू. पै |
|---|---|---|---|---|
| भालचंद्र परशुराम मेहंदळे | २५ | ५ | ०-११-१० | ०-१० |
| | २६ | ३ | ०-१५-०० | ०-१५ |
| भौमिक भरत शहा | २६ | ६ | ०-३१-६० | १-१० |

तरी सदर मिळकतीवर कोणाचाही गहाण, दान, लिज, विक्रीचा करार, पोटगी, चार्ज, बक्षिस, वहीवाट, इजमेंट, बोजा, तारण, वारसा ट्रस्ट, कुळहक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी आपली लेखी हरकत सकृतदर्शनी पुराव्यासह खाली नमूद अॅडव्होकेट यांचेकडे सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १५ (पंधरा) दिवसाचे आत नोंदवावी. वरील मुदतीत कोणाचीही काहीही हरकत न आल्यास सदरची मिळकत ही निर्वेध बोजारहीत असल्याचे गृहीत धरून आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. १२/११/२०२४
मो.नं.८६९८४६५८९५

खरेदीदारातर्फे अॅडव्होकेट.
**अॅड.नमिता सुरेंद्र थोरवे**
रा. पोसरी ता. कर्जत जि. रायगड


## कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)

सादर सेवा

### ई-निविदा आमंत्रण सूचना

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लि. च्या वतीने, उप मुख्य अभियंता (कार्य), रत्नागिरी, खालील कामासाठी पात्र कंत्राटदारांकडून IREPS पोर्टलवर ई-निविदाद्वारे सिंगल पैकेट बिड प्रणालीमध्ये खुली निविदा आमंत्रित करीत आहेत. **कामाचे नाव:** महाराष्ट्र राज्यातील कोकण रेल्वे मार्गावरील रत्नागिरी विभागात सावर्डा-आरवली रोड स्थानकांदरम्यान 148/200-149/100 किमी येथे बर्म्स आणि आगवे कटिंग येथे ट्रॅक आणि कॅच वॉटर ड्रेन्ससह कॉंक्रीट साईड ड्रेन्सचे बांधकाम. **निविदा सूचना क्र.:** केआर-आरएन-डीवाईसीईडब्ल्यू-आगवे-6अ-2024 **दिनांक:** 12/11/2024. **एकूण अंदाजे मूल्य:** ₹ 1.20 कोटी (जीएसटी वगळून). **बोली सुरू होण्याची तारीख:** 19/11/2024. **ऑनलाइन प्रस्ताव / बोली सादर करण्याची शेवटची तारीख/ वेळ:** 03/12/2024 रोजी 15:00 वाजेपर्यंत. **पूर्ण होण्याची कालावधी:** पावसाळ्यासह 12 (बारा) महिने. मॅन्युअल ऑफर स्वीकारल्या जाणार नाहीत. तपशील / सहभागासाठी कृपया https://ireps.gov.in वेबसाइटला भेट द्या. शुद्धिपत्र/ परिशिष्ट फक्त या वेबसाइटवर प्रकाशित केले जाईल.


## जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे विहूर, ता. मुरूड, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेली शेतजमिन मिळकत **अ. मजीद अब्दल्ला पांगारकर,** राहणार विहूर, ता. मुरूड, जि. रायगड यांच्या निर्वेध मालकी हक्काची असून, सदर जमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझ्या अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाचा करार सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान स्वाक्षरीत झाला आहे. सदरील जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्या बाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील **अ. मजीद अब्दल्ला पांगारकर**, यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, मालकी हक्क निर्वेध असले बाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **१४ (चौदा)** दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

**वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| विहूर ता. मुरूड | २३९ | ०-१९-७०<br>०-००-५०पो.ख.<br>०-२०-२० एकूण | ३-५६ |

अलिबाग,
दिनांक : ११/११/२०२४.

सही/-
**(अॅड. संजय म. भगत)**
हिराबाग सोसायटी,
अे विंग, टिळक रोड,
अलिबाग-रायगड.
खरेदीदारांचे वकील

## जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे विहूर, ता. मुरूड, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेली शेतजमिन मिळकत **वसीम शफी पांगारकर,** राहणार विहूर, ता. मुरूड, जि. रायगड यांच्या निर्वेध मालकी हक्काची असून, सदर जमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझ्या अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाचा करार सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान स्वाक्षरीत झाला आहे. सदरील जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्या बाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील **वसीम शफी पांगारकर,** यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, मालकी हक्क निर्वेध असले बाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **१४ (चौदा)** दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

**वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| विहूर ता. मुरूड | २४० | ०-२८-५०<br>०-००-८०पो.ख.<br>०-२९-३० एकूण | ३-५६ |

अलिबाग,
दिनांक : ११/११/२०२४.

सही/-
**(अॅड. संजय म. भगत)**
हिराबाग सोसायटी,
अे विंग, टिळक रोड,
अलिबाग-रायगड.
खरेदीदारांचे वकील

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की, खाली नमूद केलेल्या जमिन मालकांने त्यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खाली वर्णन केलेली जमिन मिळकत आमचे पक्षकार यांना विकत देण्याचे ठरविले असून त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे - सांडशी, ता. कर्जत, जि. रायगड जमिन मिळकत**

| जमीन मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| कॅजिटन फ्रान्सीस फर्नांडीस | ३० | १ | ०-०६-००<br>पो. ख. ०-०४-००<br>०-१०-०० | ०-०३ |
| | ३१ | | १-९९-८०<br>पो. ख. ०-३६-९०<br>२-३६-७० | ८-५६ |
| दिपक कान्हू श्रीखंडे | ३० | २ | ०-०६-००<br>पो. ख. ०-०२-००<br>०-०८-०० | ०-०२ |

तरी वरील मिळकतीच्या बाबत कोणाचाही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, भाडेपट्टा, मृत्यूपत्रांकित दान, जप्ती, लिज, लिएन अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल करण्यात याव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजून त्यासंबंधी कोणाचेही कायदेशीर हक्कहितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत. असे गृहीत धरून आवश्यक त्या बाबींची पूर्तता करून आमचे पक्षकार खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे. येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

कर्जत
तारीख : ११/११/२०२४
मोबाईल: ९८२२९११२०५

खरेदीदारातर्फे अॅडव्होकेट
**श्री. अे. पी. डिमेलो**
मु. भिसेगाव, ता. कर्जत, जि. रायगड

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे. फुफादेवी पाडा, ता. मुरूड, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत जमिनीच्या विद्यमान मालक श्रीम. निलम मोहन गुप्ता यांच्या अविभक्त हिश्याची जमिन मिळकत कायम स्वरूपी मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नाव | भोगवटा धारक | गट क्र. व भूमापन क्र. | क्षेत्र (हे. आर) | आकार |
|---|---|---|---|---|
| मौजे फुफादेवीपाडा, ता. मुरूड, जि. रायगड | श्रीम. निलम मोहन गुप्ता | ५/१/१ | ०-२७-०२ | ६.२५ |
| मौजे फुफादेवीपाडा, ता. मुरूड, जि.रायगड | श्रीम. निलम मोहन गुप्ता | ५/१/४ | ०-२३-०० | ५.१९ |

वर वर्णन केलेल्या दोन्ही मिळकतींपैकी श्रीमती निलम मोहन गुप्ता यांच्या अविभक्त हिश्याची जमिन मिळकत कायम खरेदी विक्री करण्याबाबतचा सदर नोटीसीचा विषय आहे.

सदर नोटीसीचा विषय असलेली मिळकत ही विद्यमान मालक श्रीम. निलम मोहन गुप्ता यांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्याक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस पुर्ण कायदेशीर हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहार हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वास कळावे.

अलिबाग
दिनांक : ११/११/२०२४

सही
**अॅड. राकेश नारायण पाटील**
रा. आगरी पॅलेस, मु.पो. चिंचोटी,
ता. अलिबाग, जि. रायगड. मो.नं. ९२७२६२०००५

# चॅम्पियन्स करंडकाबाबत संभ्रमच!

## वेळापत्रक घोषणेचा कार्यक्रम ‘आयसीसी’कडून रद्द

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) पाकिस्तानात खेळण्यास दिलेला नकार आणि त्यानंतर पाकिस्तान क्रिकेट मंडळाने (पीसीबी) पुकारलेला असहकार यामुळे पुढील वर्षी होणाऱ्या ‘आयसीसी’ चॅम्पियन्स करंडक स्पर्धेच्या आयोजनाबाबतचा संभ्रम वाढला आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेला (आयसीसी) चॅम्पियन्स करंडकाचे वेळापत्रक जाहीर करण्याचा आज, सोमवारी होणारा कार्यक्रम रद्द करणे भाग पडले आहे. ही स्पर्धा १९ फेब्रुवारी ते १९ मार्च या कालावधीत नियोजित आहे.



‘आयसीसी’कडून लाहोर येथे खास सोहळ्यात स्पर्धेचे वेळापत्रक जाहीर केले जाणार होते. मात्र, सध्या निर्माण झालेल्या गोंधळामुळे आयसीसीने हा कार्यक्रम केवळ पुढे ढकलला नाही, तर रद्द केला आहे. वेळापत्रकाबाबत यजमान आणि सहभागी देशांशी चर्चा सुरू असून, ही चर्चा पूर्ण झाल्यावर आम्ही आमच्यामार्फत कार्यक्रमाची घोषणा करू असे आयसीसीच्या एका अधिकाऱ्यानेच सांगितल्याचे कळते आहे.

‘बीसीसीआय’ने पाकिस्तानात खेळण्यास नकार दिल्यानंतर स्पर्धेच्या आयोजनासंदर्भात नव्याने चर्चेला सुरुवात झाली होती. स्पर्धा आयोजनासाठी गेल्या काही स्पर्धांचा मागोवा घेत संमिश्र प्रारूप (हायब्रिड मॉडेल) आराखड्यानुसार म्हणजे भारताचे सामने पाकिस्तानबाहेर आणि अन्य सामने पाकिस्तानात खेळविण्याचा विचार पुढे आला होता. मात्र, पाकिस्तानने यास नेहमीप्रमाणे विरोध केला असून, आता बीसीसीआयने आमच्याकडे काहीच लेखी पाठवले नाही असे सांगून असहकाराची भूमिका घेतल्याचे चित्र आहे.

### याचाही होणार विचार

आता आयसीसी सध्या पाकिस्तानातील लाहोर येथे वाढलेल्या विषारी धुक्याच्या संकटाची ढाल पुढे करण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कारणामुळे लाहोरमधील शाळाही बंद ठेवण्यात आल्या आहेत. त्याचबरोबर अन्य एका वृत्तानुसार पाकिस्तान अजून स्पर्धेच्या तयारीला लागलेच नसल्याचेही समोर येत आहे. पाकिस्तानातील निश्चित करण्यात आलेली केंद्र अद्याप पूर्णपणे अद्यायावत करण्यात आलेली नाहीत. या कामाला सुरुवातच झाली नसल्याचे सांगितले जात आहे. यामुळे क्रिकेट वर्तुळात आता स्पर्धेचे आयोजनच अन्यत्र हलविण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे मानले जात आहे. अशा वेळी पाकिस्तानला यजमानपद टिकविण्यासाठी संमिश्र प्रारूप आराखडा स्वीकारण्याशिवाय पर्याय नाही, अशीही चर्चा आहे. आयसीसीकडून आज होणारा वेळापत्रक जाहीर करण्याचा कार्यक्रम रद्द करण्याची कृती या सगळ्या शंकेची पुष्टीच करते.

### अमिराती आघाडीवर

वेळापत्रक निश्चित झालेही असेल, पण ते जाहीर करण्याची घाई आयसीसी करण्यास तयार नाही. हा कार्यक्रम रद्द करताना अन्य देशांच्या मंडळांना किती विश्वासात घेण्यात आले हे देखील विचारात घ्यावे लागेल. एकूणच आयसीसी आणि पाकिस्तान दोघांनाही ही स्पर्धा घेण्यासाठी संमिश्र प्रारूप आराखडा मान्य करावा लागेल, असे चित्र आहे. अशा वेळी भारताचे सर्व सामने घेण्यासाठी संयुक्त अरब अमिरातीला सर्वाधिक पसंती मिळत आहे. भारताचे सर्व सामने दुबई किंवा अबू धाबी येथे खेळविण्यात येतील. पाकिस्तानातील सामने रावळपिंडी, कराची आणि लाहोर येथे होतील असा पूर्वनियोजित कार्यक्रम सांगतो. मात्र, आता सगळा बदल आयसीसी केव्हा जाहीर करते याकडे सर्वांच्या नजरा लागून आहेत.

# भारताविरुद्ध खेळूच नका, पाकिस्तान सरकारचा फतवा!

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

भारतीय संघ चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी पाकिस्तान दौऱ्यावर येणार नाही... आयसीसीने अखेर ई-मेलद्वारे पाकिस्तान क्रिकेट बोर्डाला हे कळवले. आता पीसीबीवर पुन्हा नामुष्की ओढावली आहे, कारण २०२३ च्या आशिया चषक स्पर्धेचे यजमानपद असूनही भारताच्या नकारामुळे काही सामने श्रीलंकेत हलवण्यात आले होते.



तिच वेळ चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेच्या निमित्ताने ओढावणार आहे. पण, याचे दुःख पीसीबीला जेवढे झाले नसेल तेवढे पाकिस्तानी पत्रकारांना झालेले दिसतेय. त्यामुळेच आयसीसीच्या ई मेलनंतर त्यांचा आक्रसताळेपणा वाढला आहे आणि त्यांच्याकडून नको ते दावे केले जात आहेत.

सुरक्षेच्या कारणास्तव भारतीय संघाला पाकिस्तान दौऱ्यावर पाठवण्यास बीसीसीआयचा नकार आहे. केंद्र सरकारनेकडूनही त्याला विरोध आहेच. त्यात पीसीबीने तशी लेखी मागणी केली होती आणि आयसीसीने काल ई-मेल करून तसे पाकिस्तान बोर्डाला सांगितले.

भारतीय संघ येणार नाही असे स्पष्ट झाल्यानंतर पाकिस्ताचा माजी यष्टिरक्षक-फलंदाज राशिद लतिफ याने त्याचे मत मांडले. जर भारतीय संघ चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी पाकिस्तानात येणार नसेल तर त्यांनीही भारतात होणाऱ्या स्पर्धेत सहभाग घेऊ नये, असा सल्ला त्याने दिला आहे. पाकिस्तान आणि भारत आहे, म्हणून आयसीसीचे अस्तित्व आहे.

त्यामुळे जर पाकिस्तान सरकारनेही असाच संघाला भारतात खेळण्यास नकार दिला, तर आयसीसी काय करेल. भारताला द्विदेशीय मालिका नकोय, ठीक आहे. पण, आयसीसी स्पर्धा आधिच ठरलेल्या असतात. यावेळी भारत आला नाही, तर पाकिस्ताननेही कठोर निर्णय घ्यायला हवेत,असे लतिफ म्हणाला.

आयसीसीच्या ई-मेलनंतर पाकिस्तानच्या पत्रकारांनी सूत्रांच्या हवाल्याने बातम्या पेरायला सुरुवात केली आहे. पाकिस्तान सरकार मोठा निर्णय घेणार.

भारत चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी येणार नसेल तर सरकार पाकिस्तान संघाला आगामी आयसीसी स्पर्धे साठी भारत दौऱ्यावर पाठवणार नाही, असा दावा केला जातोय. एकाने तर पाकिस्तानान न येण्याचा बीसीसीआयलाच मोठा फटका बसेल.

# संजू सॅमसनने सलग दोन शतकांनतर केला नकोसा विक्रम

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात खेळल्या जात असलेल्या चार सामन्यांच्या टी-२० मालिकेतील पहिल्या सामन्यात टीम इंडियाने ६१ धावांनी शानदार विजय मिळवला होता, तर दुसऱ्या सामन्यात भारतीय संघाची सुरुवात खूपच खराब झाली. पहिल्या सामन्यात ५० शतकी खेळी साकारणाऱ्या संजू सॅमसनला गकेबरहा येथील सेंट जॉर्ज पार्कवर खेळल्या जात असलेल्या दुसऱ्या सामन्यात आपले खातेही उघडता आले नाही. केवळ ३ चेंडूंचा सामना केल्यानंतर सॅमसन खाते न उघडता मार्को यान्सनच्या गोलंदाजीवर बाद झाला. यासह संजू सॅमसनने भारतीय फलंदाज म्हणून एक नकोसा विक्रम ही आपल्या नावावर केला.



सॅमसन एका वर्षात सर्वाधिक वेळा टी-२० मध्ये शून्यावर बाद होणारा भारतीय फलंदाज ठरला

संजू सॅमसनने आता शून्यावर आऊट होऊन १५ वर्षे जुना नकोसा विक्रम आपल्या नावावर केला आहे. खरं तर, सॅमसन आता एका वर्षात टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये सर्वाधिक शून्यावर आऊट होणारा भारतीय खेळाडू ठरला आहे. याआधी हा विक्रम युसूफ पठाणच्या नावावर होता, जो २००९ साली टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात खाते न उघडता तीन वेळा पॅव्हेलियनमध्ये परतला होता. सॅमसनला या सामन्यात खातेही उघडण्यात यश आले नाही, तर शेवटच्या दोन डावात त्याने शतके झळकावली होती, त्यामुळे संघासाठी ही फारशी चिंतेची बाब नाही. संजू हा भारतीय क्रिकेटमधला पहिला खेळाडू ठरला आहे, ज्याने सलग दोन टी-२० आंतरराष्ट्रीय डावात शतके झळकावली आहेत.

भारताकडून टी-२० मध्ये सर्वाधिक वेळा शून्यावर आऊट झालेल्या खेळाडंमध्ये संजू सॅमसन ४ वेळा (२०२४),युसूफ पठाण ३ वेळा (२००९),रोहित शर्मा ३ वेळा (२०१८),रोहित शर्मा ३ वेळा (२०२२),विराट कोहली ३ वेळा (२०२४) यांचा समावेश आहे.

# पाकिस्तानने २२ वर्षांनी नोंदवला ऐतिहासिक विजय

। नवी दिल्ली। वृत्तसंस्था ।

पर्थमध्ये तिसरा एकदिवसीय सामना जिंकून पाकिस्तानने इतिहास घडवला. तिसरा एकदिवसीय सामना पाकिस्तानने आठ गडी राखून जिंकला. प्रथम फलंदाजी करताना ऑस्ट्रेलियन संघ पूर्ण ५० षटकेही क्रीजवर टिकू शकला नाही आणि ३१.५ षटकांत १४० धावांवर गडगडला. इतक्या कमी धावसंख्येवर ऑस्ट्रेलियाला ऑल आऊट करण्यात पाकिस्तानी वेगवान गोलंदाजांनी महत्त्वाची भूमिका बजावली. शाहीन आफ्रिदी आणि नसीम शाहने प्रत्येकी ३ विकेट्स घेतल्या, तर हरिस रौफने ७ षटकांत केवळ २४ धावा देत दोन फलंदाज बाद केले. या विजयासह पाकिस्तानने २२ वर्षांनी इतिहास घडवत भारताला मागे टाकले.



ऑस्ट्रेलियाच्या १४० धावांचा पाठलाग करताना पाकिस्तानच्या सलामीच्या जोडीने सलग दुसऱ्या सामन्यात आपल्या संघाला चांगली सुरुवात करून दिली आणि पहिल्या विकेटसाठी ८४ धावांची भागीदारी केली. सॅम अयुब ४२ आणि अब्दुल्ला शफिक ३७ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतले. त्यानंतर कर्णधार मोहम्मद रिझवानने बाबर आझमच्या साथीने आपल्या संघाला २६.५ षटकांत विजय मिळवून दिला. या विजयासह पाकिस्तानने तीन सामन्यांची टी-२० मालिका २-१ ने जिंकली. यासह पाकिस्तानने २२ वर्षांनतर पहिल्यांदा ऑस्ट्रेलिया वनडे मालिका जिंकली.

याआधी पाकिस्तान संघाने २००२ मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध शेवटची वनडे मालिका जिंकली होती. या संपूर्ण मालिकेत, पाकिस्तानच्या वेगवान गोलंदाजी आक्रमणासमोर ऑस्ट्रेलियाची फलंदाजी खूपच कमकुवत दिसली, परिणामी कांगारू संघाला ५ वर्षात प्रथमच मायदेशात एकदिवसीय मालिका गमावण्याचे दुःख सहन करावे लागले. पाकिस्तानने ज्या प्रकारे ही मालिका जिंकली, तो एक मोठा विक्रम ठरला आहे. पाकिस्ताननेभारतालाहीमागेटाकले. एकदिवसीय क्रिकेटच्या इतिहासात ऑस्ट्रेलियाने मायदेशात ९ मालिका गमावल्या आहेत. या काळात केवळ दोनच संघ असे आहेत, ज्यांनी एकदिवसीय क्रिकेटमध्ये ऑस्ट्रेलियाला मायदेशात दोनदा पराभूत करण्याचा मोठा पराक्रम केला आहे.पहिला संघ दक्षिण आफ्रिका आहे, ज्याने २००९ आणि २०१८ मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध मायदेशात एकदिवसीय मालिका जिंकली होती. आता अशी काम गिरी करणारा पाकिस्तान हा दुसरा संघ ठरला आहे.

### आशियाई चॅम्पियन्स हॉकी करंडकाला सुरूवात

# सलामीच्या लढतीत भारताची मलेशियाशी झुंज



। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

भारतीय महिला हॉकी संघ बिहारमधील राजगिर येथे सुरू होत असलेल्या आशियाई चॅम्पियन्स करंडकात विजेतपद राखण्यासाठी प्रयत्नांची शिकस्त करताना दिसणार आहे. भारतीय महिला हॉकी संघासमोर सलामीच्या लढतीत मलेशियाचे आव्हान असणार आहे. पहिल्याच दिवशी जपान-दक्षिण कोरिया व चीन- थायलंड यांच्यामध्ये अन्य लढती रंगणार आहेत.

आशियाई चॅम्पियन्स हॉकी करंडकात सहा देशांचा समावेश आहे. यामध्ये भारतासह मलेशिया, दक्षिण कोरिया, थायलंड, चीन व जपान या देशांचा समावेश आहे. भारतीय महिला संघ मलेशियानंतर दक्षिण कोरियाला लढत देईल. ही लढत १२ नोव्हेंबरला होईल. त्यानंतर १४ नोव्हेंबरला थायलंडचा सामना करावा लागेल. भारतीय महिला संघ १६ नोव्हेंबरला चीनशी, तर १७ नोव्हेंबरला जपानशी दोन हात करेल. १९ नोव्हेंबरला उपांत्य फेरीच्या लढती पार पडणार असून २० नोव्हेंबरला अजिंक्यपदाची लढत रंगेल.

भारतीय महिला हॉकी संघाने २०१६ व २०२३ मध्ये या स्पर्धेचे अजिंक्यपद पटकावले आहे. दक्षिण कोरियाने आतापर्यंत सर्वाधिक तीन वेळा या स्पर्धेत विजेता होण्याचा मान संपादन केला आहे, तसेच भारतासह जपाननेही दोन वेळा या स्पर्धेच्या अजिंक्यपदाला गवसणी घातली आहे.

### विश्वकरंडकाची तयारी

भारतीय महिला हॉकी संघाचे मुख्य प्रशिक्षक हरेंद्र सिंग यांनी या स्पर्धेबाबत मत व्यक्त करताना म्हटले की, २०२६ मध्ये विश्वकरंडक होणार आहे. त्यानंतर २०२८ मध्ये लॉस एंजिलिस ऑलिंपिकचे आयोजनही करण्यात येणार आहे. या दोन महत्त्वाच्या स्पर्धांची तयारी आशियाई चॅम्पियन्स हॉकी करंडकाद्वारे आम्हाला करता येणार आहे.

### महिला संघाच्या लढती

११ नोव्हेंबर – मलेशिया
१२ नोव्हेंबर – दक्षिण कोरिया
१४ नोव्हेंबर – थायलंड
१६ नोव्हेंबर – चीन
१७ नोव्हेंबर – जपान

# जितेश साजेकरला कांस्यपदक

**खरोशी** : सुहित जीवन ट्रस्ट संचालित एकलव्य व्यावसायिक प्रशिक्षण केंद्र, पेण - रायगड येथील विद्यार्थी स्पेशल ऑलिम्पिक भारत महाराष्ट्र स्टेट युनिफाईड चॅम्पियनशिप क्राइस्ट युनिव्हर्सिटी लवासा, पुणे यांच्या वतीने ९नोव्हेंबर रोजी आयोजित राज्यस्तरीय बॅटमिंटन स्पर्धेत भाग घेऊन जितेश साजेकर या विद्यार्थ्याने कांस्य पदक व प्रमाणपत्र मिळवून अतिशय उत्कृष्ट अशी कामगिरी बजावून घवघवीत यश संपादन केले.या विद्यार्थ्यांचे समाजातील सर्व स्तरांवर कौतुक होत आहे. त्यांच्या या यशामध्ये विद्यार्थ्यांची मेहनत, पालक, शिक्षक व मुख्याध्यापक, यांचे सहकार्य पाठबळ व मार्गदर्शन आहे.



### कबड्डी असोसिच्या पंचवार्षिक निवडणुकीत कृष्णा पाटील, मालोजी भोसले यांच्या

# ‘धर्मवीर कबड्डी विकास’पॅनलचा दणदणीत विजय

। मुंबई । वृत्तसंस्था ।

ठाणे जिल्हा कबड्डी असो. च्या पंचवार्षिक निवडणुकीत कृष्णा पाटील, मनोज पाटील , भरत पाटील ,मालोजी भोसले यांच्या धर्मवीर कबड्डी विकास पॅनलचे सर्वच्या सर्व उमेदवार बहुमतांनी निवडून आले. ठाण्याच्या श्री मावळी मंडळाच्या सभागृहात मतदान प्रक्रिया राबविण्यात आली व त्याच दिवशी सायंकाळी मतमोजणी करण्यात आली. या अगोदरच त्यांच्या पॅनलचे कृष्णा पाटील - अध्यक्ष, (ठाणे) भरत पाटील (काल्हेर) - कार्याध्यक्ष, समीर खेडेकर (ठाणे) कोषाध्यक्ष, तर भगीरथ पाटील(वळ,भिवंडी), विशाल गलुगडे (कोपरखैरणे), मंदार तावडे (बदलापूर ), मोरेश्वर पवार(ठाणे) यांची सहचिटणीस म्हणून बिनविरोध निवड झाली होती. आज फक्त सरचिटणीस-१, सहकोषाध्यक्ष- १, व सदस्य - १० या पदाकरीता निवडणूक घेण्यात आली.



● मालोजी दत्तात्रेय भोसले, कृष्णा दादू पाटील, भरत जयवंत पाटील

या झालेल्या निवडणुकीत सरचिटणीस या पदाकरीता मालोजी भोसले व सचिन पाटील यांनी उमेदवारी दाखल केली होती. यात भोसले (ठाणे)यांना ४०६, तर सचिन पाटील (ठाणे )यांना १५४ मते मिळाली. मालोजी भोसले (ठाणे) यांनी २५२ मतांनी विजय मिळविला. सहकोषाध्यक्ष करीता बाळू उबाळे(कल्याण)यांना ४२६, तर देवानंद पाटील (दापोडे, भिवंडी) यांना ९९ मते मिळाली. बाळू उबाळे यांचा ३२७ मतांनी विजय झाला. भूषण पाटील ५२६ (काल्हेर भिवंडी), सुधाकर चौघुले ५१६ (वडूनवघर, भिवंडी), प्रवीण दळवी ५१९(ठाणे), जगदीश धुमाळ ५२२ (टिटवाळा ), सुरेश लांघी ४८७ (कल्याण), रोशन म्हात्रे ५२२ (कालवार), मिलिंद पाटील ५२० (डोंबिवली), संदीप शिकारे ५१५ (कोपर खैरणे, नवी मुंबई ), दशरथ शिंदे ५१०(ठाणे), सुरेश तरे ५१७(बदलापूर) हे १० सदस्य म्हणून निवडून आले, तर धनराज पाटील (कल्याण)५८, मनोज चव्हाण (रबाळे)४३ हे पराभूत झाले.

निवडणूक अधिकारी म्हणून निवृत्त न्यायाधीश दिलीप जोशी यांनी, तर त्यांचे सहाय्यक म्हणून मिनानाथ धानजी, सदानंद माजलकर यांनी काम पाहिले.

### दहा वर्षांनंतर अमेरिकन खेळाडू विजेती

# कोको गॉफचे संस्मरणीय विजेतेपद

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

**कोको गॉफ हिने शनिवारी मध्यरात्री डब्ल्यूटीए फायनल्सच्या विजेतेपदाला गवसणी घातली. तिने अंतिम फेरीच्या लढतीत ऑलिंपिक पदकविजेती झेंग किनवेन हिच्यावर ३–६, ६–४, ७–६ असा तीन सेटमध्ये रोमहर्षक विजय मिळवला आणि पहिल्यांदाच ही स्पर्धा जिंकण्याची किमया करून दाखवली. याआधी २०१४ मध्ये अमेरिकेच्या सेरेना विल्यम्स हिने डब्ल्यूटीए फायनल्स या स्पर्धेच्या विजेतेपदावर हक्क सांगितला होता. १० वर्षांनंतर कोको गॉफच्या रूपात अमेरिकन महिला खेळाडू विजेती ठरली.**



झेंग किनवेन हिने पहिला सेट ६-३ असा जिंकला. त्यानंतर कोको गॉफ हिने दुसऱ्या सेटमध्ये ६-४ असे यश संपादन करीत १-१ अशी बरोबरी साधली. तिसऱ्या सेटमध्ये झेंग किनवेन ही २-० अशी पुढे होती, तसेच तिने ही गॉफ दडपणाखाली होती. झेंग किनवेन हिच्याकडे जेतेपदाची सुवर्णसंधी होती. दोनच गुणांची तिला गरज होती. अखेर तिसऱ्या सेटमध्ये ६-६ अशी बरोबरी झाली आणि टायब्रेकरचा अवलंब झाला. यामध्ये कोको गॉफ हिने सलग सहा गुण मिळवले. झेंग किनवेन हिने दोन गुण मिळवत झुंज देण्याचा प्रयत्न केला, पण दमदार फोरहँड मारत कोको गॉफ हिने झळाळता करंडक पटकावला.

### ४० कोटींची कमाई

कोको गॉफ हिने या स्पर्धेद्वारे तब्बल ४०.५४ कोटी रुपयांची कमाई केली. कोको गॉफ हिने डब्ल्यूटीए फायनल्स या स्पर्धेच्या अंतिम फेरीत पोहोचण्याआधी १९.५४ कोटी रुपयांची कमाई केली. अंतिम फेरीत विजय मिळवल्यानंतर तिला विजेतेपदाचे २१ कोटी मिळाले. एकूण ४०.५४ कोटी रुपयांची कमाई तिला करता आली.

### अव्वल दोन खेळाडूंवर मात

कोको गॉफ हिने डब्ल्यूटीए फायनल्स या स्पर्धेमध्ये जागतिक क्रमवारीत पहिल्या स्थानावर असलेल्या अरीना सबलेंका व दुसऱ्या स्थानावर असलेल्या इगा स्वीअतेक यांच्यावर मात केली. तसेच वयाच्या २०व्या वर्षी ही स्पर्धा जिंकणारी कोको गॉफ ही मारिया शारापोव्हा हिच्यानंतरची पहिलीच खेळाडू ठरली.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१–२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग–email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग– email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए–५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२–२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)